सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ३

जून २०२३

# मासिक नवस्नेह

स्वागतमूल्य

₹. 30/-




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,

मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# अधिक महिना 'पुरुषोत्तम मास'

**अधिक महिन्याला पुरुषोत्तम मास का म्हणतात जाणून घ्या !**

या महिन्याचा राजा होण्यासाठी कोणतीही देवता तयार नव्हती. अशा परिस्थितीत ऋषी मुनींनी भगवान विष्णूला या महिन्याचा भार स्वतःवर घ्यावा असे आवाहन केले. भगवान विष्णूंनी ही विनंती मान्य केली म्हणून त्याला 'पुरुषोत्तम मास' म्हटले जाते.

या महिन्यात पुरणाचे दिंडे करून इष्ट मित्रांना, नातेवाईकांना भोजन देतात. या दिंडांना धोंडे सुद्धा म्हणतात. यावरून या महिन्यास 'धोंडा महिना सुद्धा म्हणतात. अधिक महिन्यात नामकरण, मुंज, विवाह आणि गृह प्रवेश, नवीन, मौल्यवान वस्तू खरेदी इत्यादी सामान्य धार्मिक संस्कार केले जात नाहीत म्हणून याला 'मलमास' असे नाव ठेवले गेले आहे.

**या महिन्याला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे**

पुरुषोत्तम महिना हा भगवान विष्णूंचा प्रिय महिना आहे. या महिन्यात प्रभु श्री राम,भगवान श्रीकृष्ण आणि श्री हरी यांची उपासना करणे खूप महत्वाचे आहे. हा महिना शिवपूजनासाठीही उपयुक्त आहे. या महिन्यात जप, तपस्या,दान यांचे विशेष महत्त्व आहे.

**अधिक मासातील व्रते, नियम व दाने**

रोज फक्त एकदाच फलाहार करावा. मासान्ति फळांचे दान करावे. रोज गाईला पूरण पोळीचा घास द्यावा नाहीतर कमीत कमी गोग्रास तरी घालावा. रोज फक्त एकच धान्य शिजवून खावे. मासान्ति मेहूण जेवावयास बोलावून त्यांना धान्य द्यावे सत्पात्री ब्राह्मणाला दक्षिणा द्यावी. रोज केळीच्या पानावरच जेवावे मासान्ति ब्रम्हणाला पक्वान्न भोजन द्यावे. नक्त भोजन करावे (दिवसभर उपाशी राहून रात्री पहिल्या प्रहरात जेवावे.) एकदाच जेवावे. महिनाभर सतत नामस्मरण करावे. यात कुलदैवताचे नामस्मरण सर्वश्रेष्ठ. हा अतिशय पवित्र महिना मानला जातो, देवाची उपासना आणि दानधर्म करण्यासाठी खूप शुभ मानला जातो.

**महिन्यातील दान**

जावयाला अनारसे, बत्तासे, म्हैसूरपाक वगैरे जाळीदार पदार्थ दान म्हणून द्यावयाचे असतात. या महिन्यात नारळ, सुपाऱ्या, फळे यांसारख्या वस्तू सुद्धा तेहतीसच्या पटीत घेऊन दान करतात. या महिन्यात शुक्ल व कृष्ण पक्षात वेगवेगळी दाने दिली जातात.

**शुक्ल पक्ष दान**

(१) मालपुआ (२) खीर भरलेले पात्र (३) दही (४) सुती कापड (५) रेशीम कापड (६) घोंगडी किंवा रग (७) तूप (८) तीळ गूळ (९) तांदूळ (१०) गहू (११) दूध (१२) खिचडी (१३) साखर आणि मध (१४) तांब्याचे पात्र (१५) चांदीचा नंदी

**कृष्णपक्षाचे दान**

(१) तुपाने भरलेला चांदीचा दिवा (२) सोने किंवा कांस्य पात्र (३) हरभरा (४) खारीक (५) गूळ, तुर डाळ (६) लाल चंदन (७) बत्तासे (८) कापूर केवडा अगरबत्ती (९) केशर (१०) कस्तुरी (११) गोरोचन (१२) शंख (१३) गरुडघंटा (१४) मोती किंवा मोती मणी (१५) हिरा किंवा पन्ना रत्न

**या मासात काय खावे ?**

या महिन्यात गहू, तांदूळ, मूग, जव, वाटाणे, तीळ, काकडी, केळी, तूप, सुंठ, चिंच, सैंधव मीठ, आवळा या पदार्थांचे सेवन केले असता त्या व्यक्तीच्या जीवनात शारिरिक पीडा कमी होते. यापासून बनवलेल्या या वस्तू आणि जीवनात सात्विकता वाढवतात. म्हणून या महिन्यात वरील पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे.

**पुरुषोत्तम महिन्यात काय खाऊ नये ?**

या महिन्यात तमोगुणी पदार्थांचे सेवन करू नये. उडीद, मसूर, वांगं, लसूण, कांदा, मुळा, मद्य, मांस, धूम्रपान आदिच्या सेवनाने तमो गुणांच्या वाढीचा परिणाम आजीवन राहतो म्हणून पुरुषोत्तम महिन्यात या गोष्टींचे अन्न वर्ज्य मानले जाते. या महिन्यात आपल्याला आवडणाऱ्या वस्तूचा त्याग करावा (उदा.एखादे फळ अथवा एखाद्या रंगाचे वस्त्र वगैरे) भगवान विष्णूचे नियमित स्मरण केल्यास जीवनातील सर्व संकटे नष्ट होतात आणि संतती व संपत्ती प्राप्त होते.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ९ वे : अंक ३ : जून २०२३**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या – 'वृंदा'** /५
- ज्योत्स्ना शिंत्रे

३) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / ८
- सौ. मंजुश्री गोखले

४) **झाशीची राणी–महाराणी लक्ष्मीबाई** / ९

५) **म्हणींचे म्हणणे** /१० – वैदेही जोशी

६) **मुलांचे पान** / १२

७) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
- सौ. मंजुश्री गोखले

८) **अद्‌भूत श्रीकृष्ण मंदिर** /१७ – संकलित

९) **तो चालण्यासाठी नव्हे तर उडण्यासाठी जन्मलाय** /२३ – संकलित

१०) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १६ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

कसे आहात? काय म्हणता, मे महिना संपला एकदाचा ! खरं आहे. 'एकदाचा' असं म्हणण्यासारखाच तो त्रासदायक ठरतोय. पण आता जून सुरू झालाय. पावसाची नुसती चाहूलच सुखद वाटते ना? अर्थात कधी कधी (म्हणण्यापेक्षा) आजकाल पाऊसही त्रासदायक ठरू लागलाय. काय ते 'ग्लोबल वार्मिंग' की काय म्हणतात ते ! ते काय असेल ते असो, पण हवामान घातक बनत चाललय ही 'वॉर्निंग' मिळते आहे, हे मात्र खरं. पण जून महिना म्हणजे उन्हापासून दिलासा, शाळा सुरू झाल्यामुळं मुलांचं आणि त्यामुळे सगळ्या घराचच रुटीन बसणार म्हणून दिलासा आणि पाऊस पडणार म्हणूनही दिलासा. एकूणच जून महिना हा दिलासा देणारा महिना !

असो. जूनच्या या आपल्या अंकात नेहमीची सदरे आहेतच. पण सोबत काही नवीन माहिती, किस्सेही आहेत. मित्रांनो, तुम्हाला एक विनंती आहे की तुमचे अभिप्राय आमच्यापर्यंत पोहोचू देत. तुमच्या सूचना, साहित्य यांचंही स्वागत आहे. एकंदरीत आपला 'नवस्नेह'चा अंक तुम्हाला कसा वाटतो? आवडतो की नाही? कोणते विषय त्यात तुम्हाला अभिप्रेत आहेत? हे पोहोचू दे ना आमच्यापर्यंत ! आम्हालाही आवडेल ते आणि अंक तुम्हाला आवडतो की नाही हेही आम्हाला कळेल ! तेव्हा प्लिज ही सूचना लक्षात घ्या.

४ जूनला आपल्या चित्पावन संघाचा वर्धापन दिन आहे. आपला संघही दिवसेंदिवस जास्त ॲक्टिव्ह होतो आहे आणि ती काळाची गरजच आहे. संघाच्या या उज्वल वाटचालीसाठी नवस्नेहकडून हार्दिक शुभेच्छा ! अर्थात आपला संघपरिवार हा एक मित्रपरिवार आहे. आणि मित्रपरिवारासोबत आपलं भविष्य सुरक्षित असतं, खरं ना?

**याद ऐसे करो की कोई हद न हो।**
**भरोसा इतना करो, की कोई शक न हो।**
**इंतजार इतना करो, की वक्त न हो।**
**दोस्ती इतनी करो, की कभी नफरत न हो।**

तर मित्रांनो, तुमची आणि नवस्नेह परिवाराची दोस्ती अशीच तर आहे. ती कायम असणार आहे. तेव्हा दोस्ती की खातीर आम्हाला आपले अभिप्राय कळवा. पावसाचा आनंद घ्या. उष्म्याला निरोप द्या आणि नवस्नेहचा वाचनानंद घ्या.

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या - वृंदा

**(लेखांक पाचवा)**

वृंदा ही सुद्धा राधेची एक सखीच होती. ती ललितेप्रमाणेच गोकुळात रहात होती. राधा-कृष्ण रासक्रीडेत सहभागी होत होती. कृष्णाची परमभक्त होती. परंतु तिच्याबद्दल आणखी फारशी माहिती मिळत नाही. तिचे आई-बाबा कोण आहेत हेही कळत नाही.

तिच्याबद्दल सविस्तर माहिती मिळते ती तिच्या पुढील जन्माबद्दल. कुणी म्हणतात वृंदा अशी कुणी वेगळी नव्हतीच. तर वृंदा म्हणजेच पूर्वजन्माची राधा. त्यामुळे आपण हा विषय येथेच सोडून देऊ.

त्याऐवजी आपण पंडित महादेव शास्त्री जोशी यांनी कथिलेली वृंदाची गोष्ट पाहूया. वृंदा ही दैत्यराज कालनेमी याची मुलगी होती. तिचा विवाह जलन्धर नावाच्या राक्षसाबरोबर झाला होता. जलन्धर हा शिवाचाच एक अंश होता. परंतु त्याची उत्पत्ती समुद्रामधून झाली होती म्हणून त्याचे नाव जलन्धर असे होते. एकदा जलन्धराने विष्णूपत्नी श्रीलक्ष्मीला पाहिले आणि त्याच्या मनात तिच्याविषयी गैरभाव उत्पन्न झाला. श्रीलक्ष्मीने त्याला समजावले की तुझा आणि माझाही जन्म समुद्रातूनच झाला आहे. त्या नात्याने आपण बहीण भाऊ होतो. तेव्हा जलन्धरला ते पटले आणि त्याने लक्ष्मीचा गैरनाद सोडला.

पुढे वृंदा आणि जलन्धरचा विवाह झाला. वृंदा ही फार मोठी पतिव्रता स्त्री होती. तिच्या पातिव्रत्याच्या पुण्यामुळे जलन्धरला मोठे बळ मिळाले होते. त्यामुळे तो कुणाकडूनही हारत नव्हता, ना मारला जाऊ शकत होता. अर्थातच तो उन्मत्त झाला. सगळ्या जगाला त्रास देऊ लागला. त्यातच देवलोकही आलाच. देवांची धाबी दणाणली आणि ते त्राहीमाम असे म्हणत श्री विष्णूला शरण गेले.

श्रीकृष्ण हा विष्णूचाच एक अवतार असल्याने वृंदाच्या पूर्वजन्माबद्दल विष्णूला माहिती होतीच. आपली कृष्ण अवतारातील परमभक्त वृंदा ही चुकीच्या दिशेने चालली आहे आणि जलन्धरसारख्या वाईट प्रवृत्तीच्या माणसाला आपले पुण्यबळ देत आहे, ह्याचे श्रीविष्णूला दु;ख झाले. आता वृंदाच्या उद्धाराची, तिला पूर्वजन्माची आठवण करून देण्याची वेळ आली होती हे विष्णूला (कृष्णाला) जाणवले. यापुढेही आपल्याच परमभक्ताला चुकीच्या मार्गावरून जाऊ देणे थांबवण्याची आणि वृंदेला तिच्या खऱ्या रूपाची ओळख करून देण्याची वेळ आलेली होती.

तेव्हा श्रीविष्णूने तिचे खोटे पुण्य- पातिव्रत्य नष्ट करायचे ठरवले. तो जलन्धराचे रूप घेऊन तिच्याकडे गेला आणि तिच्याशी सहवास केला. जेव्हा विष्णूने तिला खरे स्वरूप दाखवले, तिचा पातिव्रत्याच्या पुण्याचा भ्रम नष्ट झाला. आपण किती चुकीच्या मार्गाने जात होतो आणि भलत्याच गोष्टीला पुण्य समजत होतो हे तिला कळून चुकले. तिचा भ्रम नष्ट झाला आणि तिला स्वस्वरूपाची ओळख पटली. परंतु आपण कृष्णाची परमभक्त असूनही भ्रमात राहिलो, फसलो, या गोष्टीचा तिला इतका धक्का बसला की, तिने धरणीमातेला दुभंग होऊन पोटात सामावून घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे धरणीमाता दुभंगली आणि वृंदा पाहता पाहता धरणीत गाडली जाऊ लागली.

ह्या सगळ्या अनपेक्षित प्रकाराचा वृंदेला इतका मोठा धक्का बसला की धरणीमातेला विनंती करण्या आधी तिने विष्णूला- 'तू मला, एका पतीव्रतेला फसवलेस तर तू शिळा होऊन पडशील.' असा शाप दिला. खरं पाहू जाता तिचा भ्रम नष्ट व्हावा म्हणून श्रीविष्णूने हा सगळा घाट घातला. परंतु मानसिक धक्क्यामुळे वृंदेची आकलनशक्तीच जणू नष्ट झाली होती. तिला आपण काय करत आहोत याचे भान आले तेव्हा ती शाप देऊन चुकली होती.

शाप दिला की तो फळण्यासाठी स्वतःचे पुण्य नष्ट होते असे म्हणतात. त्यामुळे आपण याचा अर्थ एवढाच घ्यायचा की श्रीविष्णूला दिलेल्या शापामुळे वृंदेचे भ्रामक पुण्य नष्ट झाले आणि ती परमेश्वर

भक्तीच्या खऱ्‍मार्गाला लागली. तिचे अत्यंत पवित्र अशा तुळशीत रूपांतर झाले.

आपल्या कृत्याच्या या फलादेशाची विष्णूने अपेक्षा केली नव्हती. तोही थोडासा बेसावध होता. वृंदेचे धरतीत सामावणे इतके अनपेक्षित होते की, विष्णू तिला पकडून ठेवायला गेले, तेव्हा त्यांच्या हातात फक्त तिच्या केसांच्या बटा तेवढ्या आल्या. त्या केसांच्या बटांचीच पुढे तुळशीची रोपे झाली, जी विष्णूला (कृष्णाला) अतिप्रिय आहेत.

संतांनीसुद्धा विठ्ठलाचे – पर्यायाने विष्णूचे वर्णन – गळा तुळशीच्या माळा असेच केलेले आहे. इतकी वृंदा विष्णूशी एकरूप होऊन गेली. या प्रसंगाची आठवण म्हणून आपण दरवर्षी तुळस (वृंदा) आणि विष्णू (कृष्ण) यांचे लग्न लावतो.

आता या गोष्टीतून आपण भक्तांनी पुढे काय बोध घ्यायचा? तेच खरे या गोष्टीचे महत्वाचे सार आहे.

वृंदा ही गतजन्मीसुद्धा कृष्णभक्तच होती. कृष्णाचा अखंड सहवास, भक्ती तिला लाभलेली होती. त्यामुळे ती राक्षस कन्या म्हणून अतिशय सुखात, वैभवात जीवन जगत होती. परंतु हे तिचे सुख, या जन्मीच्या तिच्या पुण्याच्या कल्पना या भ्रामक होत्या. कधी ना कधीतरी तिला हे जाणवून द्यायला हवेच होते. तू जे पुण्य समजतेस, ते किती चुकीचे आहे, त्यामुळे गैरगोष्टींना, अपकृत्यांना बळ मिळत आहे हे कृष्णाने तिला सोदाहरण दाखवून दिले. तिला भ्रमातून बाहेर काढून योग्य मार्गावर आणण्याचे काम केले.

त्यासाठी त्याने तिचा 'दगड हो' असा शापही सहन केला. परमेश्वर त्याच्या खऱ्या भक्तासाठी काय करणार नाही? त्याने संत जनाबाईंची कामे केली, तिच्यासाठी कपडे धुतले, घर झाडून काढले, दळण दळले, संत एकनाथांच्या घरी तो श्रीखंड्या म्हणून राबला, संत दामाजींसाठी महार झाला, संत नामदेवाचा तो सखा झाला, आपल्या गळ्यातील वैजयंतीमाळा आपसूकच नामदेवाच्या गळ्यात घालू लागला.

वृंदेसाठी त्याने तिचा शापही सहन केला आणि तो शाळीग्राम झाला. आजही शाळीग्राम नावाच्या गुळगुळीत दगडाला श्रीविष्णू म्हणूनच ओळखले जाते. आणि या स्वरूपातच त्याचे आणि वृंदेचे (तुळशीचे) लग्न दरवर्षी लावले जाते.

वृंदेची गोष्ट एक प्रतिकात्मक गोष्ट आहे. ही गोष्ट आपण प्रथम समजून घेतली पाहिजे. वृंदा म्हणजे पूर्वजन्मात साधनेच्या उच्च बिंदुला पोहोचलेला साधक. परंतु असा साधकसुद्धा पुढच्या जन्मात भ्रामक सुखाच्या आणि पुण्याच्या मागे लागू शकतो. गतजन्मीच्या सुकृतामुळे या जन्मी प्राप्त झालेली सर्व भौतिक सुखे हीच खरी सुखे असे मानून जेव्हा त्यातच तृप्त रहातो, मग्न रहातो, तेव्हा परमेश्वरालाच त्याच्या

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**– अध्यक्ष**

मदतीला धावावं लागतं. कारण अशा वेळेस त्या साधकाची स्मृती नष्ट झालेली असते. आजचं वैभव हे आपल्याला कशामुळे प्राप्त झालेले आहे? या आज मिळालेल्या सर्व भौतिक सुखाचं मूल कशात आहे, याची स्मृती भक्ताला राहिलेली नसते. एक प्रकारे हीही भक्ताची परीक्षाच भगवंत घेत असतो म्हणाना ! परंतु भगवंताचं आपल्या भक्ताकडे पूर्ण लक्ष असतं. पूर्वीचा तो दोरा भक्ताने सोडला तरी भगवंत कधीच सोडत नाही. तो आपल्या भक्ताची पाठराखण करतच रहातो.

या सगळ्या भौतिक सुखांच्या भ्रमामागे कुठेतरी मानसिक, शारीरिक, सामाजिक त्रास असतोच. वृंदेच्या बाबतीत तो त्रास मानसिक होता असे म्हणायला हवे. तिचा पती जलन्धर हा राक्षसी, तामसी वृतीचा होता. त्या वृत्तीच्या प्रभावाखाली त्याने सगळ्या देवलोकाला म्हणजे सुष्ट प्रवृतींनाच वेठीला धरले होते. मुळात वृंदा ही भगवत भक्त असल्याने तिच्या पतीच्या आसुरी वृत्तीचा तिला मानसिक त्रास होत असणारच. परंतु पातिव्रत्याच्या भ्रमामुळे ती त्या त्रासाकडे डोळेझाक करत होती. कदाचित ती जलन्धरला समजावण्याचा प्रयत्न करीतही असेल, पण पतीला विरोध न करणं म्हणजेच पातिव्रत्य असा भ्रम तिच्या मनात रुतलेला होता. आजही ह्याच प्रकारच्या गोष्टी स्त्रियांना शिकवल्या जातात, हे आपण पहातोय. परंतु पतीला विरोध न केल्यामुळे जगाचे काय नुकसान आपण होऊ देत आहोत, हे वृंदाला कळत नव्हते. तिच्या या विरोध न करण्याच्या धोरणामुळेच तिला जलन्धराकडून सर्व भौतिक सुखे प्राप्त होत होती. पण हा असा काळ कधी ना कधी सरतोच. पूर्वपुण्याईची गंगाजळी किती दिवस पुरणार? शेवटी वाहत्या गंगेची गरज असतेच ना? त्यामुळे श्रीविष्णूंना तिच्या डोक्यावरचा भ्रमाचा पडदा दूर करून तिला तिच्या पूर्व सुकृताची ओळख करून द्यावी लागली. तिला भ्रामक सुखाच्या गर्तेतून ओढून बाहेर काढावे लागले.

या सर्व प्रक्रियेमध्ये वृंदाचे शारीरिक अस्तित्व नष्ट झाले आणि केसाच्या काही बटाच फक्त विष्णूच्या हाती लागल्या. म्हणजे तिच्या या जन्मीच्या भ्रमाचा फार मोठा हिस्सा नष्ट झाला आणि पूर्व पुण्याईचा दोरा – बटा हातात धरून परमेश्वराने तिला जिवीत ठेवले; तिचे रूपांतर तुळशीसारख्या एका पवित्र आणि बहुपयोगी झुडुपात झाले.

आजही तुळशीचे अनेक उपयोग (औषधी) आहेतच. त्यामुळे तुळशीचे रोप लावणे शुभ समजले जाते. हे झाड आवर्जून घरात लावले जाते. त्याचे रोज पूजन केले जाते. वृंदाच्या खऱ्या पुण्याच्या स्मृती आजसुद्धा अशाप्रकारे आपल्या संस्कृतीने जागृत ठेवल्या आहेत. एवढेच नव्हे तर दरवर्षी तुलसी-विवाह श्रीविष्णूशी करून, तिच्या उद्धाराची आठवणही आपल्या संस्कृतीत जागी ठेवली गेली आहे असे म्हणावे लागेल.

या सर्व कारणांमुळे आणि वृंदाच्या समर्पित भक्तीमुळे वृंदेला कृष्णसखी हे नाव आपसूकच प्राप्त झाले आहे असे म्हणायला काही हरकत नाही.

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**

मोबा. ९९२००५८७०५


सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

गुरुवार, दि. 25 : गुरुपुष्यामृत

आपलं दुकान

महाद्वार रोडवर,

0231-2546585


**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

**अध्याय ३ : कर्मयोग**

**श्रीभगवानुवाच ।**

**जया सत्त्वगुण असे अर्जुना ।**
**तो करूनी न लिंपे गुणकर्म लक्षणा ।**
**गुणां गुणी वर्तती म्हणवून ।**
**आपण नव्हे अशक्त ।।२८।।**
गुण हे आणि हीं कर्मे ह्यांहुनी वेगळा चि मी ।
ज़ाणे तत्त्व-ज्ञ गुंते ना गुणांत गुण वागातां ।।२८।।

**प्रकृतीच्या गुणाते मोहिती ।**
**मूर्ख गुणकर्मी अशक्त होती ।**
**तेथे ज्ञानियाची युक्ती । कांही न चले ।।२९।।**
गुंतले गुण-कर्मी ज़े भुलले प्रकृती-गुणें ।
त्या अल्प ज़ाणणारांस सर्व-ज्ञें चाळवूं नये ।।२९।।

**तू कर्मे अवघी मज अर्पी ।**
**चित्त आत्मयाच्या ठायीं समर्पी ।**
**उदार होऊनिया निरापेक्षी । युद्ध करिता होय ।।३०।।**
मज़ अध्यात्म-वृत्तीनें सर्व कर्मे समर्पुनी ।
फलाशा ममता सर्व सोडुनी झुंज़ तूं सुखें ।।३०।।

**हे माझे ज्ञानमत । जो नर वाही हृदयी अखंडित ।**
**निर्द्वंद्व श्रद्धा युक्त । तो मी करी विरक्त पां ।।३१।।**
माझें शासन हें नित्य ज़े निर्मत्सर पाळिती ।
श्रद्धेनें नेणते ते हि तोडिती कर्म-बंधनें ।।३१।।

**हे तुजप्रति म्यां सांगितले ।**
**ते न पाहाती न प्रवर्तती मनुष्य जन्मा आले ।**
**सर्व ज्ञानापासुनि चकलें ।**
**ते मूर्ख श्रय न पवती भ्रष्टपणें ।।३२।।**
परी मत्सर-बुद्धीनें ज़े हें शासन मोडिती ।
ज्ञान-शून्य चि ते मूढ पावले नाश ज़ाण तूं ।।३२।।

**ज्ञानि असला जरी । प्रकृति चेष्ट स्वभावे करी ।**
**पंचभूतें प्रकृतितें पावती अवधारी ।**
**तयार निग्रह काय करील ।।३३।।**
ज्ञानी हि वागतो त्याच्या स्वभावास धरूनियां ।
स्वभाव-वश हीं भूतें बलात्कार निरर्थक ।।३३।।

**जया इंद्रिया कल्पना बहुत । रागद्वेषें असे वर्तत ।**
**ते तेथें होती अशक्त । मोक्ष पावती कैसेनी ।।३४।।**
इंद्रियीं सेवितां अर्थ राग-द्वेष उभे तिथें ।
वश होऊं नये त्यांस ते मार्गांतील चोर चि ।।३४।।

**आपला धर्म अल्प असोनि । परधर्म बरवा देखोनी ।**
**परी आपला धर्म बरवा जाण मनीं ।**
**पर धर्मी भय असे ।।३५।।**
उणा हि आपुला धर्म पर-धर्माहुनी बरा ।
स्व-धर्मांत भला मृत्यु पर-धर्म भयंकर ।।३५।।

# झाशीची राणी

# महाराणी लक्ष्मीबाई

महाराणी लक्ष्मीबाईसाहेब गंगाधरराव नेवाळकर, म्हणजेच झाशीची राणी लक्ष्मीबाई, (नोव्हेंबर १९, १८३५ – जून १७, १८५८) या एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या राणी होत्या. हिंदुस्थानात इ.स. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध झालेल्या स्वातंत्र्य उठावातील या एक अग्रणी सेनानी होत्या. त्यांच्या शौर्याने त्यांना 'क्रांतिकारकांची स्फूर्तिदेवता' म्हणून जनमानसात अढळ स्थान प्राप्त झाले आहे.

राजमुद्रा: रानी लक्ष्मीबाई सवंत १९१० ( फारसी व उर्दू ) भाषेत. हिंदी व मराठी अर्थ राणी लक्ष्मीबाई वर्ष १८५४

राजमुद्रा जयते : श्रीमंत रितेशराजे ठाकूर व
कवीवर्य मनिष अहिरे द्वारा निर्मित
।। स्वराज्यरक्षिनी फिरंगमर्दीनी ।। राज्ञी लक्ष्मी
जयते विरांगणी ।। शस्त्रधारिनी समर भवानी ।।
गंगाधर भार्या झांशी सम्राज्ञीनी ।। स्वातंत्र्यलक्ष्मी।।

बालपण : महाराणी लक्ष्मीबाईंचे मूळ नाव मणिकर्णिका होते. त्यांचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. तांबे कुटुंब मूळचे भट्ट. ते रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते. साताराच्या धावडशी येथील ब्रम्हेंद्र स्वामींनी तांबे ना सेवेत रुजू करून घेतले होते. मुळ पुरुषाची समाधी मंदिराच्या परिसरात आहे. नंतर काही मंडळी दक्षिणेकडे गेली, कोट, कोलधे, खेडकुळी या भागात राहिली. तर कृष्णाजी, बळवंतराव, मोरोपंत आणि सदाशिव हे पुणे, काशी, बिठूर आणि झाशीला वास्तव्यास राहिले. आज काही वंशज नागपूर व सातार्‍यात आहे. तांबेचा पानिपत युद्धात ही सहभाग होता.

राणीचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी येथे १९ नोव्हेंबर १८३५ झाला.

जन्मतिथी : श्री चंद्रगुप्त विक्रमादित्य सवंत १८९२ श्रीनृप शालिवाहन शक १७५७ मंमथ संवत्सर स्वस्तिश्री राज्याभिषेक शक १६१ कार्तिक कृष्ण पक्ष चतुर्दशी वार गुरुवार दिनांक १९ नोव्हेंबर १८३५ रात्री ३.४० काशी, वाराणसी, उत्तर प्रदेश.

तांबे हे मुळनिवासी गुढे ग्राम, रत्नागिरी येथील होते. व्यवसायानिमित्त पुणे व सातारा येथे स्थायी झाले. तर नेवाळकर मुळनिवासी कोट ग्राम, रत्नागिरी येथील होते. पेशव्यांनी त्यांना जळगावच्या पारोळा येथील जहागीर दिली. व कालांतराने झाशी संस्थानची सुभेदारी दिली. इ.स. १८१८ नंतर इंग्रजांशी तह करून नेवाळकरांनी झाशी वंशपरंपरागत घेऊन महाराजा ही पदवी धारण केली.

व्यक्तिमत्त्व : धोरणी, चतुर, युद्धशास्त्रनिपुण, शूर आणि थोर कर्तृत्व व नेतृत्व असणार्‍या राणी लक्ष्मीबाई जन्मतः कोणत्याही राजघराण्यातील नसल्या तरी राजघराण्याशी संबंधित व्यक्तींमध्ये वावरलेल्या, वाढलेल्या होत्या. अश्वपरीक्षेचे सर्व मापदंड माहीत असणार्‍या राणी लक्ष्मीबाई घोडेस्वारी करण्यातही वाकबगार होत्या. त्या काळी पूर्ण हिंदुस्थानात श्रीमंत धोंडोपंत बाजीराव पेशवे व नानासाहेब पेशवे आणि जयाजी शिंदे व महाराणी लक्ष्मीबाई या तिघांशिवाय कोणीही अचूक अश्वपरीक्षा करणारा नव्हता. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणार्‍या राणी लक्ष्मीबाईंनी युद्धशास्त्रातही प्रावीण्य मिळविले. बाजीरावांच्या पदरी बाळंभट देवधर नावाचे उत्तम कसरतपटू आणि कुस्तीगीर होते. त्यांनीच मल्लविद्येत पारंगत होण्यासाठी मल्लखांब नावाचा कसरतीचा वेगळा प्रकार शोधून काढला. मनाची एकाग्रता, विलक्षण चपळता, शरीराचा तोल सांभाळण्याचे पूर्ण कौशल्य, काटकपणा आणि चतुरस्र भान वृद्धिंगत करणार्‍या मल्लखांब विद्येतही

**(पुढील मजकूर पान ११ वर पाहा...)**

# म्हणींचे म्हणणे

## नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे...

तन्मय... ए तन्मय... मला जरा परडी काढून दे रै लॉफ्टवरची. कांदे वाळत घातले आहेत गच्चीत ते भरून आणायला सोपे पडेल. मिनाक्षीने मुलाला हाक मारून काम सांगितले आणि ती स्वयंपाकघरात दुसऱ्या कामाला निघून गेली. मधे अर्धातास गेला तरी तन्मयचा पत्ता नाही. अन् काम तर झालेलं नव्हतच. मिनाक्षीने काही न बोलता मोठी पिशवी काढून ठेवली. दुपारी पाहुणे येणार जेवायला म्हणून घरात लगबग होतीच. खरंतर सुट्टी म्हटलं की पाहुण्यांचे येणं जाणं चालू होतं. कामाला सुट्टी नसते उलट ते वाढलेलच असतं.

स्वानंदी, तुझी खोली आवरून झाली का? अगं कपड्यांचा किती पसारा काढून बसली आहेस? हायस्कूलचा युनिफॉर्म धुवून आलाय, घडी करून कपाटात ठेव. अन् रोजचे कपडे नीट लावून ठेव. गबाळेपणा तेवढा करू नको बाई. घर कसं नीट नेटकं असावं. मिनाक्षीने स्वानंदीला सुचना केली.

हो गं, करते. एवढा गेम पुर्ण झाला की करतेच. बरं, चालेल. असं म्हणत मिनाक्षीने आपला मोर्चा पुन्हा स्वयंपाक घराकडे वळवला. ठरल्या वेळेप्रमाणे पाहुणे मंडळी आली. पोटभर छान जेवली. मिनाक्षीने केलेल्या जेवणाची तारीफ करत गप्पा गोष्टी सुरू झाल्या. हसत खिदळत सगळं वातावरणात एकदम छान बनले होते. संध्याकाळचा चहा घेऊन थोड्या वेळाकरता आलेली पाहुणी पाहुणचार घेऊन निघून गेली.

दुसऱ्या दिवशी नेहमी प्रमाणे दिवस सुरू. मिनाक्षी आपल्या कामाला लागली. घरातली छोटी मोठी कामे प्रत्येकाने केली पाहिजेत असा तिचा कटाक्ष होता. सुट्टी आहे म्हणून त्यात बदल नाही. कारण बाकी सगळं बदलतं, काम थांबत नाहीत. पण कालचे प्रसंग मुलांपेक्षा तिच्या चांगले लक्षात राहीले होते. कारण दोघां मुलांनी तिने सांगितलेली कामं केलीच नव्हती. उलट आपण आईने सांगितलेली कामं विसरलोय हेही त्यांच्या गावी नव्हतं. कारण ते सगळं मिनाक्षीने स्वतःच केलं.

आज तन्मय एकदम आनंदात होता. संध्याकाळी त्याचे मित्र घरी येणार होते. कॉलेजला सुट्टी पडून आठ दिवस झाले होते. आज त्यांनी तन्मयकडे येऊन एकत्र फिरायला जायचा बेत केला होता. मनातल्या मनात कितीतरी प्लॅन सुरूच होते. आई, ए आई ! आज माझे मित्र आपल्याकडे येणार आहेत. त्यांना खायला छानपैकी डीश कर ना ! किंवा मस्त सरबत सुध्दा चालेल. साडेपाचपर्यंत येतील ते. मग आम्ही सगळे मिळून टेकडीवरच्या मारुतीला जाणार आहोत

हां करते. इतकच बोलून मिनाक्षी आपल्या कामाला लागली. तन्मय 'येस' म्हणत आपल्या पुढील प्लॅनकडे वळला. स्वयंपाक तयार झाला. मिनाक्षीने सरबताची तयारी करून ठेवली. पण नेहमीच्या जागेवर न ठेवता दुसरीकडे.

'ए आई, आज रीनाकडे पार्टी आहे तिच्या बर्थडेची. मीही जाणार आहे. क्षमा येणार आहे माझ्याबरोबर. मला माझा तो फ्रीलवाला ड्रेस फिटींग करून दे ना. मी काढून ठेवलाय मशिनवर. तसंही खूप दिवसात तू मशिनवर बसलीच नाहियेस.' लाडात येऊन स्वानंदी म्हणाली. तिची लाडीगोडी लावणं मिनाक्षीने ओळखलं होतं.

'हो गं, देते. एकच मिनीट ! हे काम पूर्ण करते हातातले अन् देते.' मिनाक्षी सावधपणे बोलली.

'वॉव ऽ' असं म्हणत स्वानंदीने आपला मोर्चा मोबाईलकडे वळवला.

ठरल्या वेळेप्रमाणे एक एक मित्र घरी आले. तन्मय मिनाक्षीला म्हणाला, 'आई, काय देणारेस? सरबत की वेगळं काही?' मिनाक्षी हसली. 'अरे, तू काही म्हणालास का मला? मी ऐकलंच नाही.' तन्मयला राग आला. बाहेर मित्र बसलेत अन् आई म्हणतेय ऐकलं नाही. सकाळी तर 'बरं हो' म्हणाली होती.

'आई, असं काय करतेस?'

'म्हणजे कसं?'

'मी तुला सांगितले होते. तू ऐकलं होतस. बरं पण म्हणाली होतीस. फ्रीजमध्ये काही तयार केलेलं

दिसत नाहीये.' थोडसा चिडका स्वर लागला.

'हो का? असेल असेल. तू कसं कांदा आणायला लॉफ्टवरून परडी काढायचं ऐकलं होतस तसंच झाले असेल माझे कदाचित !'

क्षणभर तन्मय चपापला. अरे हो की, आपण काल ऐकलं न ऐकलं केलं. अन् तो समजायचं ते समजला.

खरंतर बाहेर जाऊन खाणंपिणं करता येईल अशी त्यांची परिस्थिती नक्कीच होती. पण काही गोष्टी, काही संस्कार पक्के मनावर बिंबवले होते संपूर्ण घराने. आपण वयाने वाढलो की जबाबदारी आणि कर्तव्याने देखील वाढायचं. हा संस्कार होता. कारण अशा बारीक सारीक गोष्टीच सवयी बनतात.

तो न बोलता जाऊ लागला. तशी मिनाक्षी म्हणाली, 'करून ठेवलय पन्हं. पण ते शेजारच्या काकूंकडे आहे. घेऊन ये जा. आणि हो, त्यांनाही त्यातले प्यायला दे.' तन्मय न बोलता जे समजायच ते समजून निघून गेला.

प्रसंग दुसरा असाच झाला. स्वानंदी ड्रेस घालायला गेली तर फिटींग केलेला नव्हताच. रागारागाने आईला विचारायला येणार, तेवढ्यात दादाचा अन् आईचा संवाद कानावर पडला. क्षणभर तीही थांबली. एरवी आपल्या कामात चोख असणारी आई, आज असं का वागली हे तिलाही उमगलं. तीच्या लक्षात आलं, काल आपणही 'आलेच गेम पूर्ण करून' असं म्हटलं होतं. पण गेलोच नाही. ती न बोलताच मागे फिरली. दुसरा ड्रेस घातला अन् मिनाक्षीजवळ आली. 'आई, काल चुकलं माझं. मी गेम पूर्ण करून उठल्यावर काम करायला यायला हवं होतं.'

मिनाक्षी हसली. तिला जवळ घेत म्हणाली, 'तुझी चूक कळली न तुला? बास ! जा जाऊन ये रिनाकडे, तोपर्यंत मी ड्रेस फिटींग करून ठेवते. पुढच्या वेळी घाल.'

मिनाक्षी मशिनवर बसली. कालचे आणि आजचे दोन्ही प्रसंग मनातच घोळू लागले होते. मनुष्य स्वभावच मुळी विचित्र असतो. चालढकल करायची. ऐकलं न ऐकलं करायची सवय आपसूक लागते अन् त्याला अमुक एक असं वय नसतच. मोठी माणसं देखील अशा गोष्टी हेतुपूर्वक करतात. लहान मुलांनाच दोष देण्यात अर्थ नाही.

असं झालं की कुठल्याही ठिकाणी, कुठल्याही घटकांना... अगदी सरकारी यंत्रणेपासून कुटुंबातील माणसांपर्यंत दोष देत म्हणतो, 'नळी फुंकिली सोनारे... इकडून तिकडे गेले वारे...' अपेक्षित असलेले परिणाम दिसतच नाहीत. म्हणून वेळीच नळीची सुधारणा केली की, विचार मनात रूजायला सोपे जाते. खरं ना?

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

# महाराणी लक्ष्मीबाई

**(पान नं. ९ वरून पुढे...)**

राणी लक्ष्मीबाई तरबेज झाल्या. महाराणी लक्ष्मीबाईंचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी धोरणीपणाने लष्करी पोषाखात वावरण्याचे ठरवले.

१९ मे इ.स. १८४२ मध्ये त्यांचा विवाह झाशी संस्थानाचे राजे झाशी नरेश श्रीमंत महाराजाधिराज महाराजा गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला. तेव्हा त्यांचे नाव बदलून लक्ष्मी असे ठेवण्यात आले. लग्नानंतर झाशीच्या प्रजाजनांत राणीबद्दल विशेष प्रेम निर्माण झाले.

दरबाराचे कामकाज राणीने पाहणे गंगाधररावांस पसंत नसल्याने मिळालेल्या वेळेचा उपयोग राणी लक्ष्मीबाईंनी स्वत्व जपण्यासाठी केला. त्यांनी आपला रोजचा व्यायाम, कसरत, घोडेस्वारी, तलवारबाजी नियमित सुरू ठेवली.


महाराज गंगाधरराव नेवाळकर व महाराणी लक्ष्मीबाई यांना मुलगा झाला परंतु तीन महिन्याचा असताना तो मृत्यू पावला. मुलाच्या रूपाने वारस मिळाल्याच्या आनंदात असणारे गंगाधररावही या गोष्टीने दुःखी झाले. त्यांनी वासुदेवराव नेवाळकर यांच्या आनंदराव मुलाला दत्तक घेऊन त्याचे दामोदर असे नाव ठेवले. २१ नोव्हेंबर इ.स. १८५३ मध्ये महाराज गंगाधररावांचे निधन झाले.

**– संकलित (ंरिघ**


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा




## » फरक ओळखा




## » ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक चोविसावा)

९

''अस्तुप्रेताप्यायने प्रेतपिंडाय अभिरम्यतां अभिरतास्म:।।'' निवृत्तीच्या उच्चारासरशी ज्ञानदेवानं तिलांजली पूर्ण केली. चौघांनी हात जोडले. आई-बाबांच्या आठवणीनं चौघांच्याही डोळ्यांतून आसवं ओघळत होती. अश्मावर तिलांजली देण्यासाठी प्रत्येक जण पुढे झुकत होता आणि गालावरून ओघळणारा अश्रू त्या अश्मावर पडत होता आणि त्या अर्घ्यजलाच्या तिलांजलीपेक्षा या अश्रूंच्या तिलांजलीने तो अश्म जणू कृतकृत्य होत होता. धन्यता पावत होता. सोपानानं त्याला वाळवंटातून उचलून हातात घेतल्यापासून जणू त्याचा पर्वकाळ सुरू झाला होता. पुण्याईचा संचय खुला झाला होता आणि सोपानाच्या स्पर्शानं साध्या दगडाचा अश्म बनल्यापासून ते हे आत्ताचे तिलांजलाचे अर्घ्यजल अंगावर पडेपर्यंत तो अश्म नुसता थरारत होता; शहारत होता. तिलांजली देऊन झाली होती. आता काकस्पर्श विधी होता. त्याची तयारी सुरू झाली. कावेरीअक्कांनी शिजलेला भात आणून दिला. तो पत्रावळीवर घेऊन त्यात काळे तीळ घालून निवृत्तीनं तो मळून घेतला. त्याचे पाच मोठे गोळे व पाच लहान गोळे केले. कावेरीअक्कांबरोबर आलेली मुक्ता हे सगळं बारकाईने बघत होती. ती काही विचारणार, तोच कावेरीअक्कांनी तिला दाबलं. ''हे बघ मुक्ता, बाळा, आता सगळा विधी पूर्ण होईपर्यंत काहीही विचारायचं, बोलायचं नाही. सगळं झालं, की मग तू विचारून घे तुला काय विचारायचंय ते ! समजलं ! आता तोपर्यंत गप्प राहा हो ! शहाणी माझी बयो ती!'' अक्कांच्या या बोलण्यावर मुक्तीनं समजूतदारपणे मान हलवली आणि निवृत्तीदादा काय काय करतोय, हे ती लक्षपूर्वक बघायला लागली. मनात साठवून ठेवू लागली. त्या प्रत्येक क्रियेचा आपल्या परीने अर्थ लावू लागली आणि जे समजत नव्हतं ते लक्षात ठेवून त्याबद्दलच्या प्रश्नांची यादी तिच्या मनात तयार करू लागली.

निवृत्ती एकाग्र चित्तानं मांडणी करत होता. ज्ञानेश्वर त्याला मदत करत होता, तर सोपान लागेल ती वस्तू देत होता. सोपानाच्या मनातही अपार उत्सुकता होती; पण कावेरीअक्कांनी मुक्ताला केलेली सूचना आपल्यालाही आहे, हे त्याने समंजसपणानं ओळखलं आणि निवृत्ती काय करतोय, इकडे तो लक्षपूर्वक बघू लागला. त्यातल्या काही कियांचे अर्थ त्याला कळले होते; पण काही क्रिया या अतर्क्य होत्या. त्याबद्दलच्या शंका नंतर ज्ञानादादाला विचारून त्यांची उत्तरं मिळवायची असं त्यानं मनाशी ठरवलं आणि निवृत्तीदादाला सामग्रीमधली एकेक वस्तू देण्याकडे आपलं लक्ष त्यानं केंद्रित केलं.

निवृत्तीदादानं तीन दर्भाच्या काड्या लावून एक त्रिकोणी वेदी केली. त्यावर गोमय मिश्रित पाणी शिंपडून ती पवित्र करून घेतली. त्यावर मधल्या भागात थोडे दर्भ अंथरले. त्यावर गंध, हळद व तुळशीपत्र ठेवलं. प्रत्येक मध्यभागी एक व चार दिशेला चार मातीचे कुंभ पाण्यानं भरून ठेवले. प्रत्येक कुंभाजवळ एक पताका लावली. नंतर त्या प्रत्येक कुंभाच्या जवळ एक असे पाच पिंड ठेवले. त्यावर गंध, तुळशीपत्र, माका, पांढरी फुलं, काळे तीळ घातले. दर्भाचे पवित्रक घातलं आणि आचमन केलं, आमंत्रक प्राणायम केला आणि मंत्र म्हणायला सुरुवात केली. ''अद्यपूर्वीच्चरित वर्तमान एवं गुणविशेषण विशिष्टायां पुण्यतिथौ मम आत्मन: श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यस्यर्थं वत्स गोत्राय स: प्रेताय क्षुत्पिपासानिवृत्त्यर्थं अयं पिंड: सोदकुंभ उपतिष्ठतां ! प्रेताधिपतये रुद्राय अयं पिंड: सोदकुंभ

उपतिष्ठतां। पिंडोपरि तिलोदकमुपतिष्ठता। ...इहलोकं परित्यज्य गतोसिपरमाङ्तिम् गतोसिदिव्यदेहेनक-शत्वाहंनियोजये।।'' प्रत्येक कुंभावर पिंड देत निवृत्ती श्लोक उच्चारत होता. नंतर पश्चिमेकडच्या पिंडाला वगळून त्याने सगळ्या पिंडांना दर्भ लावला. त्यानंतर निवृत्तीनं त्या सर्व पिंडांना नमस्कार केला. नमस्कार करताना निवृत्तीचा चेहरा चिंताक्रांत होता. निवृत्तीनंतर ज्ञानेशानंही नमस्कार केला. त्याचंच अनुकरण सोपानानं व नंतर मुक्ताईन केलं. कावेरअक्कांनी आणि विनायकबुवांनी पिंडांना नमस्कार केला. निवृत्तीनं एकदा सभोवती नजर टाकली. गंगेच्या घाटावर गावातली अनेक मंडळी जमली होती. काहींच्या चेहऱ्यांवर कणव होती, तर काहींच्या चेहऱ्यांवर तिरस्कार, काही चेहऱ्यांवर चिंता होती, तर काही चेऱ्यांवर उपहास; पण असं असलं, तरी एक भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती, ती म्हणजे उत्सुकता. निवृत्तीच्या चेहऱ्याकडे पाहणाऱ्या ज्ञानेश्वरानंही सभोवती नजर फिरवली. त्याच्याही नकळत त्याच्या कपाळावर एक लहानगशी आठी उमटली; पण ज्ञानेशाच्या चेहऱ्यावरची तेवढीही हालचाल निवृत्तीच्या नजरेतून सुटली नाही. त्यानं ज्ञानेश्वराचा हात धरला. त्या स्पर्शात दिलासा होता. ज्ञानेशाचा चेहरा निवळला. या सगळ्यापासून अनभिज्ञ असलेले सोपान आणि मुक्ता, एवढासा चेहरा करून उभे होते. घशात हुंदका दाटलेला, डोळ्यांच्या कडांवर साठलेलं पाणी आता ओघळू की मग ओघळू, अशा अवस्थेत असलेलं, थरथरणारे ओठ, कंप पावणाऱ्या नाकपुड्या आणि भिजलेलं मन. सोपान-मुक्ताची ही अवस्था ना निवृत्ती-ज्ञानेशाच्या नजरेतून सुटली, ना कावेरीअक्कांच्या. त्यांनी सोपान-मुक्ताचा हात धरला. थरथरणारे,घामजलेले इवले हात. त्या केविलवाण्या स्पर्शानं कावेरीअक्कांचेही डोळे भरून आले. मघापासून त्यांनी हुंदका आवरून धरला होता. 'आपण पोक्त आहोत, आपणच रडलो, तर ही पोरेपण रडतील. मग त्यांना आवरणार कोण? सावरणार कोण?' या विचारानं त्यांनी मनातले कढ मनातच ठेवले होते; पण आता सोपान-मुक्तीच्या स्पर्शाने तो बांध फुटला आणि कावेरीअक्कांच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहायला लागलं. त्या दोघांचा हात धरून कावेरीअक्कांच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहायला लागलं. त्या दोघांचा हात धरून कावेरीअक्का विधिस्थानापासून बाजूला गेल्या. निवृत्ती, ज्ञानेश्वर, विनायकबुवा पाठोपाठ आले. सगळे जण विधिस्थानापासून दूर जाऊन उभे राहिले. आता पश्चिमेकडच्या त्या पिंडाला काकस्पर्श होणं गरजेचं होतं. सोपानानं आकाशात नजर टाकली. बुचाच्या झाडावर असंख्य कावळे बसले होते. सोपानानं पाहिलं त्यातला एक मोठा कावळा टक लावून पिंडाकडे बघत होता.

पिंडाकडे टक लावून बघणारा कावळा काहीसा विचारात पडला होता. त्या पश्चिमेकडील पिंडाला काकस्पर्श होणं गरजेचं होतं. त्यालाही पश्चिमेकडचा पिंड उचलायचा होता. त्या पिंडाकडे त्यानं नजरही लावली होती. दोन वासनादेह तिथं तरंगताना त्याला दिसत होते; पण आपण जे पाहतो आहोत, त्यावर कावळ्याचाही विश्वास बसत नव्हता. ते म्हटले तर सावनादेह होते आणि नव्हतेही. इतर वासनादेहांप्रमाणे त्यांना कोणतीही अभिलाषा दिसत नव्हती. उलट देवलोकांत जाण्यासाठी ते दोन्ही देह उत्सुक दिसत होते. तरीही, तरीही त्या दोघांच्या नजरेत एक अपेक्षा होती, एक विनंती होती, एक प्रश्न होता, एक विषय होता, एक मागणं होतं, एक वचन हवं होतं आणि तरीही त्याबद्दल अपेक्षा होती; पण आग्रह नव्हता. प्रश्न होता, पण उत्तराचा अट्टाहास दिसत नव्हता. विनंती होती; पण हट्ट नव्हता. विषय होता, पण वैषयिकता नव्हती. मागणं होतं; पण आडमुठेपणा नव्हता. वचन हवं होतं; पण त्यापायी बांधिलकीची आशा नव्हती. कसलीतरी आस होती, पण दुराग्रह नव्हता. त्यांचे तिथं असणारं पारदर्शी अस्तित्व कावळ्याला दिसतही होतं आणि त्यांच्या वासनामय देहाला देवलोकाची लागलेली ओढही त्या पारदर्शी अस्तित्वातून त्याला जाणवतही होती. म्हणूनच तो काहीसा संभ्रमात पडला. काकस्पर्श

अस्तित्वातून त्याला जाणवतही होती. म्हणूनच तो काहीसा संभ्रमात पडला. काकस्पर्श न करावा, तर या दोन जीवात्म्यांची देवलोकाकडे प्रयाण करण्याची ओढ त्याला जाणवत होती आणि काकस्पर्श करावा, तर त्या दोघांच्या जिवाला लागलेली कसलीतरी उत्कट असही त्याला जाणवत होती. म्हणूनच संभ्रम पडून तो कावळा काही न सुचून नुसत्याच घिरट्या घालत होता. कधी तो पिंडाजवळ येई, तर कधी पिंडापासून लांब जाई. कधी वाळवंटात जाऊन बसे, तर कधी परत झाडावर जाई. असं बराच वेळ चाललं. कावळा पिंड उचलू पाहतोय; पण पुन्हा परत फिरतोय, हे विनायकबुवांनी पाहिलं. ते निवृत्तीला म्हणाले, ''निवृत्ती, त्या दोघांची कोणतीतरी इच्छा अपुरी राहिली आहे, असं वाटतं. कदाचित, या मुक्तीत रुक्मिणी-वहिनींचा जीव अडकला असेल. तिला सांभाळतो, असं म्हणा. मग कदाचित कावळा शिवेल !'' विनायकबुवांचं बोलणं ऐकून कावेरीअक्कांना हुंदका फुटला, ''होय रे निवृत्ती, या पोरीत त्या माउलीचा जीव अडकला असेल हो ! या एवढ्याशा जिवाला सोडून जाताना तिला, त्या आईला किती यातना झाल्या असतील? या दोन सज्जन आणि पापभीरू माणसांना देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावताना त्या चांडाळाना काहीच कसं वाटलं नाही? निवृत्ती, पोरा पुढे हो आणि सांग बाळा, सगळ्या भावंडांचा आणि विशेष करून मुक्तीचा नीट सांभाळ करीन म्हणून.'' (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 09021011001 6181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**


## माणूस म्हणून जगताना...

**माणूस म्हणूनी जगताना**
**भेदभाव तो सोडा हो,**
**एकएक करुनी तोडा आता**
**जातीपातीच्या बेड्या हो...**

**जन्माला या आल्यापासून**
**सुरू आमुचा लढा हो,**
**लढण्या साऱ्या प्रश्नाशी**
**एकजूट साऱ्यांनी ठेवा हो...**

**तप्त उन्हात रक्त आटवत**
**वाहतो डोईवरुनी घडा हो,**
**सहयोगाने साध्य साधते**
**उठवा दुष्काळाचा वेढा हो...**

**थकलेल्याला हात देऊनी**
**माणूस माणूस जोडा हो,**
**मुक्या जीवाला देऊनी थारा**
**जागा माणुसकीच्या नावा हो...**

**येता दारी कोणी पुढारी**
**सदैव सावध रहा हो,**
**महा बिलंदर असती हे**
**ओळखा त्यांचा कावा हो...**

**पोखरतो जो समाज सारा**
**भ्रष्टाचार तो गाडा हो,**
**सदैव स्मरणात राहू द्या**
**देशहिताचा विचार हो...**

**गरजे वेळी नसते कोणी**
**शिका आज हा धडा हो,**
**विसरू नका कधी कोणी**
**सबसे उपरवाला बडा हो...**

**– मंदार पानवलकर.**

# अद्भुत श्रीकृष्ण मंदिर



पंचवीस वर्षांपूर्वी आम्ही सोमनाथ दर्शनासाठी गेलो होतो.त्यावेळी सोमनाथ जवळच हे अद्भुत कृष्णमंदिर आमच्या पाहण्यात आले. आमच्या मार्गदर्शकामुळेच आम्ही हे मंदिर पाहू शकलो.हे मंदिर प्रभासपट्टण पासून बरेच लांब असल्यामुळे सहसा येथे कुणी जात नाही. पर्यटक, यात्रेकरू, भाविक, या कुणालाच या मंदिराची माहिती नसते.मार्गदर्शक, टॅक्सीवाला,अशापैकी एखाद्याने या मंदिरात जाण्याचे सुचवले तरी अंतर बरेच असल्यामुळे मंदिरासारखे मंदिर असे म्हणत वेळ व पैसा खर्च करून जाण्यास सहसा कुणी तयार नसते. दैवात होते म्हणून आम्हाला असा मार्गदर्शक भेटला, आम्हाला जाण्याची श्रीकृष्णाने बुद्धी दिली व कृष्णाचे आणि कृष्ण मंदिराचे दर्शन झाले.

सोमनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे हे सर्वांना माहीत आहेच.महंमद गजनवीने यावर अनेकदा स्वाऱ्या केल्या आणि मंदिराची नासधूस केली.अगणित संपत्ती लुटून नेली. या गोष्टी इतिहासाच्या पुस्तकातून सर्वांना माहीत झाल्या आहेत. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या उद्धवस्त मंदिराचे पुनर्निर्माण सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. उद्घाटनाला त्यावेळचे राष्ट्रपती बाबू राजेंद्र प्रसाद आले होते.

सोमनाथ गुजरातमधील सौराष्ट्र विभागात समुद्रकिनारी प्रभासपट्टण तीर्थक्षेत्री आहे. वेरावळ बंदराजवळ हे तीर्थक्षेत्र व मंदिर आहे.

प्रभासपट्टण तीर्थ अनेक कारणांनी सर्वांना माहीत आहे. सोमनाथ मंदिर स्थापनेच्या अगोदर पासून हे तीर्थ होते. चंद्राला दक्षप्रजापती कडून शाप मिळाला. हा शाप कां मिळाला त्याची कहाणी थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

सोम म्हणजे चंद्र अत्यंत तेजस्वी, सुंदर परंतु शांत असे व्यक्तिमत्त्व होते. त्याची मोहिनी कोणत्याही व्यक्तीवर पडत असे. दक्ष प्रजापती हा राजा होता. त्याला सत्तावीस कन्या होत्या. त्याने त्यांचा विवाह सोम म्हणजेच चंद्र याच्याशी केला. या सत्तावीस कन्यांमध्ये रोहिणी ही अत्यंत सुंदर होती.सर्व कन्याना चंद्र समान वागणूक देईल अशी दक्ष प्रजापतीची कल्पना होती.सोम केवळ रोहिणीमध्येच रममाण होता.दक्षाच्या इतर कन्यांनी वडिलांकडे चंद्राच्या वर्तणुकीबद्दल तक्रार केली. दक्षाने चंद्राला तुला क्षय होईल असा शाप दिला.दिवसेंदिवस चंद्र कृश व निस्तेज होत गेला. चंद्र निस्तेज झाल्यामुळे वनस्पतींवर वाईट परिणाम होत होता. शापमुक्त होण्यासाठी विष्णूने चंद्राला शंकराची उपासना करण्यास सांगितले. या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने प्रभासपट्टण येथे शंकराची उपासना केली. तप केले. शंकर प्रसन्न झाले. चंद्र म्हणजे सोमला उःशाप मिळाला. परंतु दक्ष प्रजापतीच्या शापापासून पूर्ण मुक्तता मिळाली नाही. पंधरा दिवस चंद्राचा क्षय होतो. अमावस्येला चंद्र लुप्त होतो. शुक्ल प्रतिपदेपासून पुन्हा पौर्णिमेपर्यंत तेजस्वी होत जातो. या कालखंडात तो दक्ष प्रजापतीच्या सत्तावीस मुलींच्या प्रासादाना भेट देतो म्हणजेच सत्तावीस नक्षत्रांमध्ये फिरतो.

सोमच्या विनंतीवरून भगवान शंकर इथे राहिले. शंकराच्या मंदिराला सोमनाथ असे नाव पडले. बारा ज्योतिर्लिंगापैकी हे एक प्रमुख ज्योतिर्लिंग आहे.

तीर्थस्थान म्हणून चंद्राने तपश्चर्येसाठी प्रभासपट्टण तीर्थक्षेत्र निवडले होते. येथे तीन नद्यांचा संगम म्हणजेच त्रिवेणी संगम आहे. सरस्वती कपिल व हिरन या त्या तीन नद्या होत. द्वारकेपासून याचे अंतर सुमारे दोनशे किलोमीटर आहे. यादव अनेकदा पर्वणीकाळात येथे स्नानासाठी येत असत. येथूनच श्रीकृष्ण निजधामास गेले. यादवांचा वारुणीच्या नशेमध्ये आपसात लढल्यामुळे येथेच विनाश झाला. हे सर्व आपल्याला माहीत असेलच. (श्रीकृष्णचा मुलगा सांब यादवांच्या विनाशाला कारणीभूत कसा झाला आहे याची कथा येथे विस्तारभयास्तव देत नाही.) या तीर्थक्षेत्री अनेक मंदिरे आहेत. बहुतेक मंदिरे कृष्णाची आहेत परंतु काही मंदिरे शंकराची व इतर देवदेवतांची आहेत. येथे जैन मंदिरही आहे.

आम्ही वेरावळ येथे उतरलो होतो. आमच्या हॉटेलमध्येच रमाकांत नावाचे एक मध्यमवयीन गृहस्थ आमची चौकशी करीत आले. त्यांना हॉटेल मालकानेच आमच्याकडे पाठविले होते. मार्गदर्शक म्हणून तुमच्याबरोबर मी येऊ का? अशी विनंती त्यांनी केली.यात्रेला आलेल्या लोकांना मार्गदर्शक म्हणून ते काम करीत असत. त्यांचा स्वभाव आम्हाला आवडला. त्यांच्याबद्दल आमचे मत चांगले झाले. आम्ही त्यांच्याबरोबरच सर्वत्र फिरण्याचे ठरविले.

प्रत्येक ठिकाणी ते सविस्तर वर्णन करून इतिहास पुराणकथा इत्यादी सांगत असत. अर्थात त्यातील बऱ्याच गोष्टी आम्हाला माहीत होत्या. कांही नवीन गोष्टी कळत होत्या. माहीत असलेल्या गोष्टींची उजळणी होत होती. आम्ही त्यांना हे आम्हाला माहीत आहे ते आम्हाला माहीत आहे असे करून अडविले नाही. त्याची वर्णनशैली लाजवाब होती. त्यांचे बोलणे ऐकत राहावे असे वाटत होते. त्यातून कित्येक नवीन माहितीही कळत होती. सकाळपासून दुपारपर्यंत आमची तीर्थयात्रा चालली होती.

आता सर्व यात्रा पुरी झाली म्हणून आम्ही हॉटेलवर परत येण्यास निघणार होतो. एवढ्यात रमाकांतनी आम्हाला एक विनंती केली. येथून जवळच सुमारे पन्नास किलोमीटर अंतरावर हिरण नदीच्या काठी श्रीकृष्णाचे एक अद्भुत मंदिर आहे. तुमच्याजवळ वेळ असेल आणि इच्छा असेल तर मी ते तुम्हाला दाखवतो असे ते म्हणाले.

सुमारे पन्नास किलोमीटर म्हणजे येऊन जाऊन निदान तीन तास लागणार. रस्ता चांगला असेल असे आम्ही गृहीत धरत होतो. इतक्या लांब जाऊन त्यात पाहण्यासारखे ते काय असणार? कृष्णाची अनेक मंदिरे आपण पाहिली आहेत अशी आमची आपसात चर्चा सुरू झाली. त्यावर ते गृहस्थ म्हणाले तुमची चक्कर फुकट जाणार नाही. तुमचा वेळ व पैसा फुकट जाणार नाही. याची मी तुम्हाला खात्री देतो.तिथे एवढे अद्भुत काय आहे ते आम्हाला सांगा म्हणजे आम्ही जायचे की नाही ते ठरवतो असे आम्ही म्हणालो.

त्यावर रमाकांतनी जर तुम्हाला तिथे जाऊन, मंदिर पाहून, पुरेसा आनंद मिळाला नाही तर तुम्ही मला माझे पैसे देऊ नका. त्या मंदिराबद्दलची माहिती तिथेच देणे जास्त संयुक्तिक होईल. असेही ते पुढे म्हणाले. आतापर्यंत रमाकांतबद्दल आमचा अनुभव चांगला होता. ते मंदिर खरेच दर्शनीय असणार अद्भुत असणार असा तर्क आम्ही बांधला. शेवटी आम्ही ते मंदिर पहायला जाण्याचे ठरविले.

हिरण नदीच्या काठाकाठाने होणारा प्रवास आनंददायी होता. कांही वेळा नदी जरी रस्त्यापासून दूर असली तरी बऱ्याचवेळा ती रस्त्याच्या जवळच होती. रस्त्याच्या एका बाजूला नदी व दुसऱ्या बाजूला कोकणाप्रमाणे नारळाची झाडे व शेती पाहात असताना मंदिर केव्हां आले ते कळले नाही.

मंदिर छोटेसे असले तरी त्याचे प्रांगण मोठे होते. प्रांगणामध्ये लहानमोठी शोभेची व इतर झाडे

लावली होती. एक लहानसे तळेही होते. बाहेरून मंदिर प्रशस्त प्रांगण व सर्व परिसर बघून आम्हाला आमचे पैसे वसूल झाले असे वाटले. आमची सर्व थकावट दूर झाली. अजून मंदिर उघडले नव्हते. प्रांगणात असलेल्या बाकांवर आम्ही बसलो.आमच्या पाठीमागे सूर्य पश्चिमेकडे कलला होता. समोरच मंदिर होते. मंदिराबद्दल कहाणी रमाकांत सांगू लागले.

अकराव्या शतकात राजा भोजने हे मंदिर बांधले असा उल्लेख शिलान्यासामध्ये सापडतो. मंदिराचे दोन भाग कल्पिता येतील. गाभारा व मंडप. गाभाऱ्यामध्ये सर्व शिल्पे संगमरवरी दगडातील आहेत.यमुना वाहात आहे. त्याच्याकाठी गाई चरत आहेत. एका कदंब वृक्षाखाली पारावर (चबुतऱ्यावर)बसून कृष्ण मुरली वाजवीत आहे अशी शिल्पे आहेत.जवळजवळ हजार वर्षे झाली तरीही शिल्पे कालच तयार केल्यासारखी वाटतात. गर्भगृहाच्या बाहेरही भिंतीवर पौराणिक प्रसंगातील निरनिराळी शिल्पे आहेत. मंडपात कासव मध्यभागी आहे. बाजूला भक्तांना बसण्यासाठी भरपूर जागा आहे. गाभाऱ्यात जाण्याची परवानगी फक्त पुजाऱ्याला आहे. पुढच्या बाजूला गज असलेला दरवाजा आहे. उरलेल्या तीन बाजूंना प्रशस्त खिडक्या आहेत. प्रत्येक खिडकीतून व पुढील दरवाजातून एकच दृश्य दिसते. शिल्पकाराची खुबी, त्याचे कसब असे आहे कि तुम्ही कुठूनही पाहिले तरी कृष्ण व गाई तुमच्याकडे पाहात आहेत असे वाटते.

म्हैसूरच्या राजवाड्यात आम्ही भिंतीवर घोड्यावर बसलेल्या सैनिकांची तैलचित्रे पाहिली होती. चित्रकाराची खुबी अशी होती की कुठूनही तुम्ही पाहिलेत; समोरून, डावीकडून, उजवीकडून, तरी सर्व सैनिक व घोडे तुमच्याकडेच पाहात आहेत असे वाटत असे.

चित्रकारांचे ते कसब पाहून आम्ही त्यावेळी आश्चर्यचकीत झालो होतो. शिल्पामध्येही तशीच शिल्पे तयार करता येतात याची आम्हाला कल्पना नव्हती. अजून तशी शिल्पे आम्ही बघितली नव्हती. मंदिरात जाऊन ती शिल्पे पाहण्यासाठी आम्ही उत्सुकतेने उठलो. तेवढ्यात रमाकांत म्हणाले अजून गोष्ट संपली नाही. मंदिरही बंद आहे. (गोष्ट ऐकताना मंदिर बंद आहे हे आम्ही विसरलोच होतो.) पुजारी एवढ्यात येतीलच. त्यांनी मंदिर उघडल्याशिवाय तुम्हाला आत जाता येणार नाही.

या मंदिराला कडी, कोयंडा, कुलूप, अंगचे कुलूप, साखळदंड, इत्यादी कांहीही नाही. फक्त दोन दरवाजे आहेत. ते दरवाजे मंत्र म्हणून पुजाऱ्याने बंद केले की कुणालाही उघडता येत नाहीत. फक्त पुजाऱ्याला उघडता येतात. प्रत्येक दरवाज्याला एक गुंडी आहे. ती गुंडी धरून पुजारी मंत्र म्हणतो. त्यानंतर दरवाजा उघडतो. गाभाऱ्याचा दरवाजाही तसाच बंद होतो. कडी कुलुपाशिवाय दरवाजे कुलूप लावल्यासारखे बंद असतात. लोहचुंबक वगैरे कुठेही कांहीही नाही या मंदिराचे हे वैशिष्ट्य आहे. संपूर्ण भारतात असे मंदिर कुठेही नाही. कृष्णाच्या अंगावर मोजकेच दागिने असतात. मुगुटावर हिरे लावलेले आहेत. त्यांतील कांहीही कुणालाही कितीही प्रयत्न केला तरी काढता येत नाहीत. हिरे सोने इत्यादी शिल्पामध्ये बेमालूम घट्ट बसविलेले आहे. शिल्प संगमरवरी दिसते. परंतु हातोड्याचे प्रहार केले तरीही त्याचा एकही कळपा उडत नाही.यासाठी कोणता संगमरवर वापरला माहीत नाही. कोणत्या हत्याराने संगमरवराची कताई केली ते कळत नाही. त्या संगमरवरामध्ये शिल्प तयार करताना हिरे आणि इतर रत्ने कशी बसविली तेही कळत नाही. ही शिल्पे हे शिल्पकारांना व शास्त्रज्ञांना आव्हान आहे. मंडपातील भिंती शिल्पेही तशीच अभेद्य आहेत.

भोज राजाने जेव्हा मंदिर बांधले तेव्हापासून ही अशीच रचना आहे. त्या बाबतीत एक आख्यायिका सांगितली जाते. भोज राजाचे एक गुरू होते. कोणतेही मंदिर चौवीस तास उघडे असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. कुणालाही कोणत्याही

प्रहरी देवदर्शनापासून वंचित करता येणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. दरवाजाला कडी कुलूप नसले म्हणजे भक्त केव्हांही दर्शन घेऊ शकेल. जर दरवाजाच ठेवला नाही तर पक्षी वानर माकडे गुरे मंदिरात शिरतील. म्हणून दोन्ही ठिकाणी गर्भगृह व मंदिर यांना दरवाजा ठेवण्यात आला होता.भक्तांनी हातात गुंडी धरून कृष्णाचे स्मरण केले की दरवाजा उघडता येईल असा वर त्यांनी दिला होता. हे स्मरण अत्यंत भक्तीपूर्वक करणे आवश्यक होते.नेहमी येणार्या सामान्य भक्तांना गुंडी धरून दरवाजा उघडता येत नसे. कांहीच भक्त दरवाजा उघडू शकत असत. चौवीस तास मंदिर उघडे ठेवणे व्यवहार्य नव्हते. त्यामुळे शेवटी बारा तास मंदिर उघडे ठेवण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर भोज राजाच्या विनंतीवरून त्या गुरूंनी रचनेत बदल केला. फक्त पुजाऱ्याला दरवाजा उघडता व बंद करता येईल अशी व्यवस्था केली. वंशपरंपरागत पुजारीपण चालत आलेले आहे. पुजारी आपल्या मोठ्या मुलाला दरवाजा उघडण्याची व बंद करण्याची शक्ती प्रदान करतो. ही शक्ती कशी प्रदान केली जाते त्याची कुणालाही कांहीही कल्पना नाही. जर एखाद्या पुजाऱ्याला मुलगा नसेल तर तो


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**


पुजारी त्याचा वारस कोण ते निश्चित करतो. त्याची अद्भुत शक्ती तो त्या वारसाला प्रदान करतो. जो दरवाजा बंद करतो तोच दरवाजा उघडतो. जो मंत्र दरवाजा बंद करताना म्हणावा लागतो तोच उघडताना म्हणावा लागतो.

हे सर्व ऐकल्यावर मी विचारले प्रत्येक वेळी मंत्र बदलला जातो का? तुमच्या सांगण्यावरून तसे वाटते. त्यावर मंद स्मित करीत रमाकांत म्हणाले, बरोबर आहे. मंत्र पुढीलप्रमाणे असतो. विष्णू सहस्त्रनामामध्ये विष्णूची हजार नावे आहेत. दरवाजा बंद करताना त्यातील कोणत्याही दहा नावांचा उच्चार करायचा असतो. जी दहा नावे दरवाजा बंद करताना गुंडीवर हात ठेवून उच्चारली तीच पुन्हा गुंडीवर हात ठेवून उच्चारावी लागतात. आता तुम्ही विचार करा हजार नावातील कोणतीही दहा नावे घेतली तर क्रमपरिवर्तन आणि संयोजन (permutation and combination) यानुसार असंख्य गट निर्माण होतील. यातील कोणताही गट पुजारी घेऊ शकतो.

आम्ही रमाकांतच्या बोलण्यावर विचार करीत होतो. मी पुढे रमाकांतना विचारले, समजा पुजारी सोडून आणखी कुणी बरोबर तीच दहा नावे उच्चारली, तर दरवाजा उघडेल की नाही? त्यावर रमाकांत म्हणाले बरोबर तीच दहा नावे उच्चारणे जवळजवळ अशक्य आहे. तरीही जर ती उच्चारली गेली तर काय होईल माहित नाही. आमची मती गुंग झाली होती. प्रत्यक्ष जाऊन दरवाजा उघडून पाहावे असे आम्ही ठरविले. आम्ही दरवाजाजवळ गेलो. रमाकांतने सांगितल्या–प्रमाणे दरवाज्याला कडी कोयंडा कुलूप कांहीही नव्हते.आम्ही दरवाजा ढकलून बघितला. दरवाजा अज्बिबात उघडला नाही.दरवाजा जसा कांही कुलूपबंद होता. रमाकांतच्या सांगण्यावर विश्वास होता आणि नव्हताही. तो खोटे सांगणार नाही याची खात्री वाटत होती. परंतु असे कांही असेल केवळ विष्णूची दहा नावे उच्चारून दरवाजा कुलुप बंद होईल आणि पुन्हा तीच नावे उच्चारून तो उघडेल, ही गोष्ट कुठेतरी

बुद्धीला पटत नव्हती.

जगात अशा अनेक गोष्टी असतात की त्या आपल्या नेहमीच्या तर्कशास्त्राला पटत नाहीत. बुद्धीला आकलन होत नाहीत. त्यामागे कांही वेगळेच तर्कशास्त्र असते. ते आपल्याला माहीत नसते. हे सर्व माहीत असूनही रमाकांतच्या सांगण्यावर विश्वास बसत नव्हता.

एवढ्यात संध्याकाळचे चार वाजले होते. जरी भोज राजाच्या गुरूंना मंदिर चौवीस तास उघडे असावे असे वाटत असले तरी प्रत्यक्षात ते सकाळी व रात्री बारा तास उघडे ठेवले जात असे. सकाळी सहा ते बारा व संध्याकाळी चार ते दहा. पुजारी सकाळी सहाच्या अगोदर येऊन पूजा वगैरे सर्व करीत असत.

आम्ही पुजारी पाहून बाजूला झालो. पुजाऱ्यांनी गुंडीवर हात ठेवला. तोंडातल्या तोंडात कांहीतरी मंत्र पुटपुटला. रमाकांतच्या सांगण्यानुसार त्यानी विष्णू सहस्रनामातील दहा नावे उच्चारली होती. त्यांनी हळूच दरवाजा आंत ढकलला. दरवाजा कोणतीही कुरकुर न करता उघडला. रमाकांतने सांगितलेली गोष्ट खरी होती. पटत नसली तरी मान्य करणे भाग होते.

मंदिराच्या भिंतीवर रामायणातील निरनिराळ्या प्रसंगांची शिल्पे काढलेली होती. एका बाजूला शिल्पा मागून शिल्पामध्ये रामायणातील पूर्ण गोष्ट दाखविलेली होती. रामायणातील सुवर्ण हरिण व सीता हरणाचा प्रसंग शिल्पित केलेला होता. दुसऱ्या भिंतीवर निसर्ग शिल्पे होती. मंदिराला आंतून व बाहेरून रंगरंगोटी केलेली होती. मंदिर छोटेसे परंतु देखणे होते.

आम्ही श्रीकृष्णाचे दर्शन घेण्यासाठी गाभाऱ्याजवळ गेलो. गाभाऱ्याचा दरवाजा बंद होता. त्यालाही कुठे कडीकोयंडा अंगचे कुलूप इत्यादी दिसत नव्हते. श्रीकृष्णाची मूर्ती बघण्याच्या बहाण्याने मी दरवाजा ढकलून पाहिला. दरवाजा उघडत नाही असे पाहिल्यावर जोर लावून उघडण्याचा प्रयत्न केला. दरवाजा जागच्या जागी होता. आम्ही आंतील शिल्प बघू लागलो. गाभाऱ्याच्या चारी बाजूंनी कुठूनही शिल्प बघितले तरी गाई कृष्णाकडे व कृष्ण आमच्याकडे म्हणजेच सर्व जण आमच्याकडे पाहात आहेत असे वाटत होते. हजार वर्षांपूर्वीच्या त्या अज्ञात शिल्पकाराला मी मनोमन नमस्कार केला. त्याचे कौतुक करण्याला शब्द अपुरे पडत होते. सर्व शिल्प संगमरवरामध्ये होते. छिन्नी चालविण्यामध्ये पॉलिश करण्यामध्ये किंचित फरक आणि सर्व शिल्प बिघडले असते. इतका अचूकपणा खरोखरच आश्चर्यजनक होता. पुजारी कुठेतरी बाहेर गेला होता.गुंडीवर हात ठेवून मी विष्णुसहस्रनामातील कोणते तरी श्लोक म्हटले. विष्णूची दहा नावे घेतली दरवाजा अर्थातच उघडला नाही. आंतील दरवाजा पुजारी सायंआरतीच्या वेळी उघडणार होता. आरतीपर्यंत आम्ही थांबलो असतो तर हॉटेलवर जायला उशीर झाला असता. तरीही आम्ही आरतीपर्यंत थांबण्याचे ठरविले. तोपर्यंत मंदिराच्या विस्तृत प्रांगणात एक चक्कर मारली.

तिन्हीसांजा झाल्या होत्या. पुजाऱ्यानी गुंडीवर हात ठेवून मंत्र पुटपुटला. दरवाजा अल्लद उघडला. सायंआरती झाली प्रसाद वाटण्यात आला. पुजारी अर्थातच रमाकांतच्या ओळखीचे होते. रमाकांतने पुजाऱ्याशी आमची ओळख करून दिली. आम्ही त्यांच्याजवळ गप्पा मारू लागलो. त्यांनीही रमाकांतने सांगितलेल्या दरवाजा बंद करण्याच्या व उघडण्याच्या गोष्टीला दुजोरा दिला.

ते म्हणाले, हे मंदिर भोज राजाच्या गुरूने सांगितल्यावरून येथे बांधण्यात आले. त्या गुरूंना दृष्टांत झाला होता. त्या काळात सुमारे हजार वर्षांपूर्वी भोज राजा व गुरू येथे आले. त्यांनी परिसराची पाहणी केली. गुरुंना दृष्टांतानुसार येथे कृष्णाची मुरली वाजवीत असलेली, कदंब वृक्षाखाली पारावर बसलेली, लहान मूर्ती मिळाली. येथे मंदिर बांधून त्यांत ती मूर्ती ठेवण्यात आली. यमुना गाय इत्यादी शिल्पे नंतर त्यावेळी तयार करण्यात आली.

गुरुंची इच्छा चौवीस तास मंदिर उघडे ठेवावे अशी होती. प्रत्यक्षात त्या काळीही ते व्यवहार्य नव्हते. शेवटी बारा तास मंदिर उघडे ठेवण्याचे ठरविले. गुरूंनी त्या वेळी मंदिर अभिमंत्रित केले होते. त्यामुळे अजूनही सहस्रनामातील विष्णूच्या कोणत्याही दहा नावांनी मंदिराचे दरवाजे बंद होतात व उघडतात.

या मंदिराची पुढील खास वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) संगमरवरी शिल्प अभेद्य आहे. अभेद्य संगमरवर कुठून पैदा केला? का संगमरवरावर शिल्प तयार झाल्यावर कांही रासायनिक प्रक्रिया करून तो अभेद्य बनवण्यात आला. याचा उलगडा संशोधकच करू शकतील.

२) संगमरवर अभेद्य असेल तर त्यातून शिल्प कसे तयार केले ?त्यासाठी कोणती हत्यारे वापरली ?

३) शिल्प तयार करून रासायनिक प्रक्रिया केली असेल तर ती रासायनिक प्रक्रिया कोणती? जर ती माहीत झाली तर आपल्याला शिल्पे अभेद्य करता येतील. (समाजकंटकांकडून शिल्पाची, पुतळ्याची, मोडतोड केल्याचे जे पाहायला, ऐकायला मिळते तसे समाजकंटकांना करता येणार नाही.)

४) तीन बाजूनी पाहिले तर शिल्पातील सर्व आपल्याकडे पाहतात असे कदाचित दिसू शकेल. परंतु पाठीमागील खिडकीतून पाहिल्यावरही तसेच कसे दिसते? अशी शिल्पकला कुठेही आढळत नाही. या शिल्पकलेचे मर्म कुणी शोधून काढील काय?

५) केवळ विष्णूची कोणतीही दहा नावे उच्चारून दरवाजा कुलूपबंद कसा होतो? हे गूढ काय आहे? हे गूढ उकलते तर अनेक दरवाजांची कुलपे काढून टाकता येतील. केवळ मंत्रोच्चाराने दरवाजे कुलुप बंद होतील व उघडतील.

आम्ही आश्चर्याने पुजारी सांगत होते ते ऐकत होतो. रमाकांत सांगत होते तेव्हां आम्हाला त्यांत कुठेतरी अफवा आहे असे वाटत होते. परंतु रमाकांत सत्यस्थितीचे वर्णन करीत होते.

आम्ही पुन्हा एकदा कृष्ण दर्शन घेतले. बाहेरून एकदा मंदिराला व भगवान श्रीकृष्णाला नमस्कार केला. टॅक्सीत बसून हॉटेलकडे निघालो. खरेच ते मंदिर, अद्भुत कृष्णमंदिर होते. आम्ही रमाकांतचे बोलणे डावलले असते, तिकडे लक्ष दिले नसते, तर खरेच एका मोठया अनुभवाला मुकलो असतो.

**– प्रभाकर पटवर्धन**


**संकलन– अरुण भाऊ पगार**

---

**दिनविशेष (जून २०२३)**
**ज्येष्ठ-आषाढ १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे।**



**शुक्रवार दि. २ :** शिवराज्याभिषेक दिन, **शनिवार दि. ३ :** वटपौर्णिमा, **सोमवार दि. ५ :** जागतिक पर्यावरण दिन, **मंगळवार दि. ६ :** किल्ले रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा, **बुधवार दि. ७ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.१०.३५), **शनिवार दि. १० :** जागतिक दृष्टिदान दिन, तुकाराम महाराज पालखी प्रस्थान, देहू, **रविवार दि. ११ :** संत ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान, आळंदी, **बुधवार दि. १४ :** योगिणी एकादशी, **शनिवार दि. १७ :** राजमाता जिजाऊ स्मृतिदिन, **रविवार दि. १८ :** राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, **सोमवार दि. १९ :** टेब्येस्वामी पुण्यतिथी, **बुधवार दि. २१ :** दक्षिणायणारंभ, जागतिक योगदिन, **सोमवार दि. २६ :** राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती, **गुरुवार दि. २९ :** आषाढी एकादशी, बकरी ईद.

# तो चालण्यासाठी नव्हे, तर उडण्यासाठी जन्मलाय !!

**(एक अफाट सत्यकथा)**

नमस्कार मंडळी, खूपच सुंदर लेख... खूप शिकण्यासारखे आहे म्हणून शेअर करावा वाटले.

अमृतसर येथील कनिष्ठ मध्यमवर्गीय घरात एक मुलगा जन्माला आला तोच मुळी पायात व्यंग घेऊन. दोन्ही पाय वाकडे असल्याने हा मुलगा आयुष्यात कधीच चालू शकणार नाही असं डॉक्टरांनी सांगितलं त्यावर त्या मुलाची आई कणखरपणे म्हणाली, 'तो चालण्यासाठी नाही, तर उडण्यासाठी जन्माला आलाय'

काय ताकद होती त्या माऊलीच्या शब्दात. अंगावर काटा येतो वाचतानाच. मात्र त्या शब्दात इतकी ताकद की, खरेच तो मुलगा पुढं चक्क जगज्जेता झाला. विमानाने जगभर फिरू लागला. अनेक राष्ट्राध्यक्षांना ज्याच्या हातचे जेवण आवडते म्हणून खास मागवले जाते, तो जगातील पहिल्या तीन मानांकित शेफपैकी एक असलेला विकास खन्ना ! त्याचीच ही अफाट अशी सत्यकथा !

लहानपणी चालता येत नसल्याने विकास सतत घरात असायचा. विशेषतः स्वयंपाक घरात ! तिथे आई आणि आजीसोबत तासन् तास बसायचा. कदाचित तिथूनच त्यांचा स्वयंपाकाचा प्रवास सुरू झाला. घरची परिस्थिती बेताचीच असल्याने त्यांची आजी अमृतसरच्या एका छोट्या गल्लीत पराठे बनवायची आणि विकास आईसोबत मिळून हे पराठे विकायचा.

आपल्या अपंगत्वावर जिद्दीने मात करत हळूहळू पावले टाकत हा मुलगा आयुष्याला जणू भिडला. आणि वयाच्या १७ व्या वर्षापासूनच काम करायला सुरुवात केली. सर्वप्रथम विकासने त्याच्या घराच्या मागे एक छोटा बँक्वेट हॉल उघडला. मात्र या कामात त्यांना फारसे यश मिळाले नाही. त्यांनी आणखी अनेक व्यवसाय सुरू केले, पण त्यातही त्यांना यश आले नाही. सुरुवातीलाच असे अपयशाचे फटके बसूनही तो डगमगला नाही. उलट विकासच्या कुटुंबीयांनी त्यांना नेहमीच साथ दिली.

विकास जेव्हा केटरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी गेला तेव्हा पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये निराशा झाली. पण शेवटच्या फेरीत त्यांना जेवणाबाबत प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा त्यांनी सांगितले की, 'एक दिवस मी वातानुकूलित रेस्टॉरंट उघडणार आहे, जेणेकरून पुन्हा उघड्या छताखाली अन्न शिजवण्याची वेळ येणार नाही.' असे सांगून विकास बाहेर पडला. त्यावर खुष होऊन एक्सेप्शनल केस म्हणून विशेष अधिकारात प्राचार्यांनी त्याची निवड करून प्रवेश दिला.

नंतर संधी मिळताच त्याने अमेरिका गाठली. तो काळ त्यांच्यासाठी खूप कठीण होता. त्यांनी अनेक रात्री रस्त्यावर आणि स्टेशनवर झोपून काढल्या, इतकेच नाही तर त्यांना बऱ्याच वेळा भांडी धुण्यासारखी कामेही करावी लागली. पण त्याने हार मानली नाही.

एका ठिकाणी असिस्टंट शेफ म्हणून काम मिळाले आणि लवकरच त्याच्या कौशल्याची झलक सर्वांना कळली. मात्र त्याचा मेन बॉस (शेफ) होता त्याला हे झेपलं नाही. आज न उद्या हा मुलगा आपल्या जागी येणार या भीतीने त्याने काय करावं? तर विकास झोपला असताना त्याने याच्या हातावर जोरात हातोडा मारला. की ज्यामुळे याला कधीच हाताने कुकिंग करता येऊ नये. किती भीषण होते ते !

मात्र विकास त्याबद्दल म्हणतो की, 'माझ्या आयुष्याने तिथेच वळण घेतले आणि मी ठरवलं की आता काहीतरी नक्कीच मोठं होऊन दाखवेन.' जिद्दीची ही ठिणगी त्या रात्री पडली आणि पाहता पाहता त्याने जणू वणव्याचे रूप घेऊन सर्वत्र विकास

पोचवला.

पुढे मग विकासला न्यूयॉर्कमधील 'सलाम बॉम्बे' या रेस्टॉरंटमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर तब्बल ७ वर्षांनी त्यांना एका शोमध्ये येण्याचे आमंत्रण मिळाले. अशाप्रकारे प्राइम टाईमला टीव्हीवर येणारे ते पहिले भारतीय शेफ होते. या मुलाखतीनंतर त्यांना राजेश भारद्वाज यांचा फोन आला आणि त्यांनी मिळून २०१० मध्ये न्यूयॉर्कमध्ये विकासचे स्वप्न असणारे 'जुनून' रेस्टॉरंट उघडले आणि आज ते अमेरिकेतील सर्वात प्रसिद्ध रेस्टॉरंट आहे.

विकासने 'उत्सव' नावाचे एक पुस्तक लिहिले, जे १२०० पानांचे पुस्तक आहे, ज्यात भारताच्या उत्सवादरम्यान तयार केलेल्या पदार्थांचे वर्णन केले आहे. हे पुस्तक लिहायला विकास यांना तब्बल १२ वर्षे लागली. त्यांनी या पुस्तकाची प्रत अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना भेट दिली होती. याची प्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हिलरी क्लिंटन यांनाही सादर करण्यात आली असून, त्यांनी दोन्ही देशांचे पंतप्रधान आणि राष्ट्राध्यक्षांसाठी त्यांनी जेवण बनवले आहे.

अमेरिकेत सुरुवातीच्या काळात अनेक रात्री रस्त्यावर आणि स्टेशनांवर झोपून काढणाऱ्या विकास खन्ना यांच्या नावावर आज पाच मिशेलिन पुरस्कार आहेत. २०११ मध्ये, विकासला पीपल्स मॅगझिनने अमेरिकेतील सर्वात सेक्सी आणि हॉट शेफ घोषित केले होते.

विकास खन्ना हा त्याच्या पाककौशल्यासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या आयुष्यावरही आता एक चित्रपट येतो आहे. त्याचं आयुष्य हे एखाद्या चित्रपटासारखं आहे हे ख्यातनाम दिग्दर्शक आंद्रेई सेवर्नीला वाटलं आणि त्यानं त्याच्या आयुष्यावर चित्रपट करण्याचा विचार केला. त्याच्यावरील चित्रपटाच्या शुटिंगचं काम पूर्ण झालं असून पोस्ट प्रॉडक्शनचे काम सुरू झाले आहे. विकासच्या चाहत्यांनाही त्याच्या आयुष्यावरील चित्रपटाचे वेध लागले आहेत. बेरीड सीड्स buried seeds नावानं हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

चित्रपट बेरीड सीड्समध्ये त्याच्या कुकिंग स्टाईल, आवड याविषयी मांडणी करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यात त्याच्या आयुष्याशी जोडल्या गेलेल्या वेगवेगळ्या प्रसंगाची पेरणीही त्यात करण्यात आली आहे. चित्रपटाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, परंपरा यालाही स्थान देण्यात आले आहे. भारतीय खाद्य संस्कृती, त्याची प्रमुख वैशिष्ट्ये यांना विचारात घेण्यात आले आहे. विकासनं एक स्वप्न उराशी बाळगलं आणि ते पूर्ण करण्यासाठी त्यानं घेतलेले कष्ट यावर चित्रपट भाष्य करतो. अशी हि विकासची अफाट कहाणी !

डीडी क्लास : जितकी वेदना खोल तितकी निर्मिती उच्च होत असते. बीज स्वतःला फूटभर जमिनीत गाडून घेते पण नंतर म्हणूनच दहा वीस फूट वर येऊन झाड बनते. लोकांना फळे आणि सावली देते. म्हणून तर संस्कृती समजण्यासाठी जसे वेद वाचावेत तसेच आयुष्य समजण्यासाठी वेदना वाचावी. तुमच्या वाट्याला गरिबी आली, रस्त्यावर झोपायची पाळी आली, लोकांचा प्रखर विरोध सोसावा लागतोय, अपयश तर पाठ सोडायला तयार नाही असं सगळं असलं तरी तुमच्यामध्ये असलेली जिद्द कुणीच संपवू शकत नाही. त्या एकाच गुणांवर तुम्ही संपूर्ण लढाई नुसती लढू शकता असं नाही तर जिंकूही शकता. जेव्हा कधी थोडीफार निराशा येईल तेव्हा हा विकास खन्ना आठवा ! बास ! आपोआप तुम्ही पेटून उठाल ! हे नक्की !! त्यासाठी शुभेच्छा आहेतच !

## थोडी गंमत...

ती : स्त्री आणि पुरुषांच्यामध्ये उत्तम कोण आहे ?
तो : अर्थातच पुरुष ?
ती : कशावरून ?
तो : मी कोणत्याही स्त्रीचे नाव उत्तम असल्याचे आजपर्यंत कुणाकडून ऐकले नाहीये...

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - जून २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आदिती<br>B +ve | देशस्थ | ३१/१२/९२<br>५.४ | विश्वामित्र, मीन<br>पू.भाद्र, ४ थे<br>आद्य, मनुष्य | M.Tech. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>५ लाख | अरुण धरणगावकर<br>जरगनगर, कोल्हापूर.<br>मोबा. ९५०३६४९३८२ |
| २. | यशोदा<br>--- | यजुर्वेदी | २२/१२/९२<br>५.६ | वत्स, वृश्चिक<br>ज्येष्ठा<br>आद्य, राक्षस | B.Com.<br>M.Com. | --- | वा.प्रा.<br>--- | नंदकिशोर नारायण पाठक<br>मु.पो.मुंगळा, जि.वाशिम<br>विदर्भ मो.९९२३७०३००४ |
| ३. | डॉ.लेखा<br>O +ve | कोकणस्थ | २०/५/९४<br>५.४ | भारद्वाज, सिंह<br>पूर्वा,<br>मध्य, मनुष्य | BHMS<br>MBAC | कुडाळ येथे नोकरी | वा.प्रा.<br>--- | सदानंद विठ्ठल रानडे<br>पिंगुळी,ता.कुडाळ,सिंधुदूर्ग<br>मोबा. ९४०५५४३९०७ |
| ४. | वर्षा<br>O +ve | देशस्थ | ०१/०१/९५<br>५.२ | भारद्वाज, धनू<br>मूळ, १ ले<br>मध्य, मनुष्य | M.Com. | --- | वा.प्रा.<br>--- | श्रीमती शिला चारुदत्त कुलकर्णी<br>मु.पो.काळविट्टे,ता.गडहिंग्लज<br>कोल्हापूर. ९४४८३३९८९० |
| ५. | मानसी<br>O +ve | कोकणस्थ | १५/१२/९६<br>५.३ | काश्यप, मकर,<br>धनिष्ठा, २ रे<br>मध्य, राक्षस | M.Com. | --- | वा.प्रा.<br>--- | शिरीष गोखले<br>न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर<br>मोबा. ९९२१४१२३८६ |
| ६. | मयुरी<br>AB +ve | देशस्थ | ६/६/९७<br>५.२ | भारद्वाज, मिथुन<br>आर्द्रा, १ ले<br>मनुष्य, आद्य | M.Com. | फायनान्स बँक हैद्राबाद | वा.प्रा.<br>३ लाख +<br>इन्सेन्टीव्ह | श्री. मानसी मधुकर विभूते<br>मु.पो.नृसिंहवाडी<br>९७६५४६४८२५ |
| ७. | ऋतुजा<br>O +ve | देशस्थ | ९/८/९८<br>५.१ | विष्णूवर्धन, वृश्चिक<br>अनुराधा, ३ रे<br>मध्य, देवगण | BBA<br>MBA<br>(HR) | इचलकरंजी येथे नोकरी | वा.प्रा.<br>२.५० लाख | प्रसाद देशपांडे<br>मु.पो.इंगळी,हातकणंगले<br>मोबा. ९३५९४१०२७१ |
| ८. | कस्तूरी<br>A +ve | देशस्थ | १४/६/९९<br>५.५ | भारद्वाज, मिथुन<br>मृग, ४ थे<br>मध्य, देव | D.Pharm<br>B.Pharm | खाजगी नोकरी | मा.प्रा.<br>१.५० लाख | महेश खंडेराव पेशवे<br>मु.पो.जेजुरी, पुणे<br>मोबा. ९९२२५५४८५० |
| ९. | सिद्धी<br>AB +ve | देशस्थ | १४/११/२०००<br>५ फूट | अत्री, वृषभ<br>मृग, २ रे<br>देव, मध्य | M.Com. | कोल्हापूर खाजगी नोकरी | वा.प्रा.<br>--- | विजय अनंत कुलकर्णी<br>मु.पो.कातोली, पन्हाळा<br>मोबा. ९०२१३४८४४७ |
| १०. | पूजा<br>A +ve | देशस्थ | ८/७/२०००<br>५.५ | वसिष्ठ, कन्या<br>चित्रा, १ ले<br>मध्य, राक्षस | B.Com. | --- | मा.प्रा.<br>--- | अविनाश रामचंद्र सामानगडकर<br>मु.पो.पलुस, जि.सांगली.<br>मोबा. ८३०८११४७४७ |

**सायली गिरीश बोरगावकर (देशस्थ)**

**जन्मतारीख :** १२/२/१९९४

**शिक्षण :** १० वी पास **रक्तगट :** B +ve **उंची :** ५.७

**व्यंग :** कर्णबधीर (१००%)

**पत्ता : श्री. गिरीश मधुकर बोरगावकर**

मोबा. 8788026014, 8999064225

**अपेक्षा :** शक्यतो कर्णबधीर असावा, नोकरी/व्यवसाय चालेल

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| शांडिल्य | कुंभ | --- | --- | --- | --- |

**प्रिया कुलकर्णी (देशस्थ)** **रक्तगट :** A +ve

**जन्मतारीख :** ३/८/१९९८ **उंची :** ५.१

**शिक्षण :** B.Com. German (1.1 Level)

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा. :** ८.१६ लाख

**आई वडील दोघेही जन्मत: कर्णबधीर आहेत. दोघेही बँकेत नोकरी**

**पत्ता : श्री. श्रीधर कुलकर्णी (आजोबा)**

महाद्वार रोड, कोल्हापूर. मोबा. 9930071789

**शैलेश कुलकर्णी** (वडील), **सौ. स्मिता कुलकर्णी** (आई)

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| जमदग्नी | वृश्चिक | अनुराधा | चौथे | मध्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - जून २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ओंकार<br>O -ve | देशस्थ | १८/७/८६<br>५.८ | हरित, वृश्चिक अनुराधा, ३ रे मध्य, देव | B.Com.<br>PGDBFS | TJSB बँक पुणे येथे | वा.प्रा.<br>९ लाख | देविदास कुलकर्णी<br>लिमये नगर, धायरी, पुणे<br>मोबा. ७७८७७८९७३६ |
| २. | वरुण<br>B +ve | देशस्थ | १४/१२/८७<br>५.८ | कौंडिण्य, कन्या, उत्तरा, ४ थे आद्य, मनुष्य | M.Phill. | सोलापूर येथे प्रोफेसर | वा.प्रा.<br>५०,०००/- | सुनिल हसबनीस<br>ताराबाई पार्क, कोल्हापूर.<br>मोबा. ७७६७००२९९४ |
| ३. | मिलींद<br>O +ve | कऱ्हाडे | ७/५/८८<br>५.७ | जमदग्नी, धनू पूर्वाषाढा, ३ रे मध्य, मनुष्य | B.E.<br>(Automobile) | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा.<br>३.५० लाख | सुहास देसाई<br>शाहू कॉलेज, कोल्हापूर<br>मोबा. ९०६७८८९५०६ |
| ४. | रोहन<br>O +ve | देशस्थ | ११/५/९०<br>५.८ | गौतम, वृश्चिक अनुराधा, ३ रे मध्य, देवगण | BCA<br>PGDM<br>(IT) | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>५ लाख | दिपक पत्की<br>जरगनगर, कोल्हापूर.<br>मोबा. ९९२२४९७०७३ |
| ५. | अनुप<br>A +ve | देशस्थ | १७/४/९०<br>५.११ | काश्यप, धनु पूर्वाषाढा, २ रे मध्य, मनुष्य | M.Com.<br>GDCA | MSEB सांगली येथे नोकरी | वा.प्रा.<br>६ लाख | श्रीकृष्ण गजानन गोसावी<br>गावभाग, सांगली.<br>मोबा. ८८०५९४३३३९ |
| ६. | प्रवीण<br>O +ve | देशस्थ | २८/११/९०<br>५.४ | भारद्वाज, मिथुन आर्द्रा, ३ रे, आद्य, मनुष्य | B.E.<br>(Civil) | स्वत:चा व्यवसाय कोल्हापूर येथे | वा.प्रा.<br>२.५ लाख | प्रकाश गोपाळ पाटील<br>मंगळवार पेठ, कोल्हापूर<br>मोबा. ७७४४९१४४३७ |
| ७. | सुबोध<br>O +ve | देशस्थ | ५/९/९२<br>५.७ | विश्वामित्र, धनू मूळ, २ रे, मध्य, देवगण | B.E.<br>M.B.A. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>९.३० लाख | सुरेश काशीनाथ शुक्ल<br>मारूती गल्ली, गारगोटी<br>मोबा. ९९७०८६९५५६ |
| ८. | नरेंद्र<br>--- | देशस्थ | १५/११/९३<br>५.९ | कौशिक, वृश्चिक अनुराधा, ३ रे मध्य, देवगण | M.C.A. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा.<br>४.२० लाख | श्रीमती अनघा वि.कुलकर्णी<br>उजळाईवाडी, कोल्हापूर<br>मोबा. ९९७५९४३६११ |
| ९. | अक्षय<br>O +ve | देशस्थ | ७/५/९४<br>५.६ | काश्यप, मीन उ.भाद्रपदा,४ थे मध्य, मनुष्य | B.E.<br>(Production) | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा.<br>३.२० लाख | गंगाधर कुलकर्णी<br>देवकर पाणंद, कोल्हापूर<br>मोबा. ९८२२८४००५९ |
| १०. | अक्षय<br>B +ve | देशस्थ | २/८/९५<br>५.६ | वसिष्ठ, कन्या, हस्त, ४ थे आद्य, देव | B.Tech.<br>M.S. | जर्मनी येथे नोकरी | वा.प्रा.<br>६० लाख | मधुकर कुलकर्णी<br>जरगनगर, कोल्हापूर<br>मोबा. ९५५२५८६२९४ |

### आदित्य गोपाळ मैंदर्गीकर (देशस्थ)

**जन्मतारीख :** १५/०२/८४ **उंची :** ५.९

**शिक्षण :** M.Sc. (Maths), B.A. Mass Comm. Journ. MBA (Finance), M.A. (Music)

**नोकरी :** आकाशवाणी कोल्हापूर केंद्र

स्वत:चे घर + शेती **वा.प्रा. :** ---

**पत्ता : आदित्य गोपाळ मैंदर्गीकर**

कसबा बावडा, कोल्हापूर. मोबा. 9423286257

**अपेक्षा :** पदवीधर, नोकरदार

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| --- | कर्क | पुष्य | ३ रे | मध्य | देव |

### देवदत्त उमेश कुलकर्णी (देशस्थ)

**जन्मतारीख :** ५/११/??? (AB +ve)

**उंची :** ५.६ **शिक्षण :** B.Tech. (VII Vellore) M.B.A.

**नोकरी :** पुणे येथे **वा.प्रा.** : १२,००,०००/-

**पत्ता : उमेश गोविंद कुलकर्णी**

हरिओम नगर, रंकाळा, कोल्हापूर.

मोबा. ९८५०९७०८१०, ९०११०४४८१०

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| वसिष्ठ | मीन | रेवती | दुसरे | अंत्य | देव |

**काही विष्णूचे मंत्र –**

१. ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः ।

२. श्रीकृष्ण गोविन्द हरे मुरारे। हे नाथ नारायण वासुदेवाय ।

३. ॐ नारायणाय विद्महे। वासुदेवाय धीमहि । तन्नो विष्णु प्रचोदयात ।

४. ॐ विष्णवे नमः ।

५. ॐ हूं विष्णवे नमः ।

६. ॐ नमो नारायण । श्री मन नारायण नारायण हरि हरि ।

७. लक्ष्मी विनायक मंत्र : दन्ताभये चक्रधरो दधानं, कराग्रस्वर्णघटं त्रिनेत्रम् ।
धृताब्जया लिंगितमब्धिपुत्रयालक्ष्मी गणेशं कनकाभमीडे ।

८. धन-वैभव एवं संपन्नता मंत्र ॐ भूरिदा भूरि देहिनो, मा दभ्रं भूर्या भर । भूरि घेदिन्द्र दित्ससि ।
ॐ भूरिदा त्यसि श्रुत: पुरूत्रा शूर वृत्रहन । आ नो भजस्व राधसि ।

९. साधे सरळ मंत्र – ॐ अं वासुदेवाय नम: । ॐ आं संकर्षणाय नम: । ॐ अं प्रद्युम्नाय नम: ।
ॐ अ: अनिरुद्धाय नम: । ॐ नारायणाय नम: ।

१०. श्रीविष्णुचे पंचरूप मंत्र – ॐ ह्रीं कार्तविर्याजुनो नाम राजा बाहु सहस्त्रवान ।
यस्य स्मरेण मात्रेण हतं नष्टं च लभ्यते ।।

श्रवण, वाचन, ध्यान, हे विशेष फलदायी मानले जाते. पठण करावी अशी काही स्तोत्र

श्री विष्णू सहस्त्रनाम श्री व्यंकटेश स्तोत्रं श्री रामरक्षा स्तोत्रं

सर्वात महत्वाचे म्हणजे अधिक मास माहात्म्य या ३१ अध्याय असलेल्या पोथीचे वाचन व श्रवण करावे. आपल्या ग्रूपवर मी रोज वाचन करणार आहे, आपण सर्वांनी ते श्रवण करावे.

।। श्री राम जय राम जय जय राम ।। **शुभं भवतु**

**सौ. दि. दि. उपासनी**

## अधिक मासानिमित्त दांपत्य भोजन सोहळा

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे पुरुषोत्तम मासानिमित्य ३० + ३ दांपत्यभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात आपण सहभागी व्हावे आणि आपली दांपत्ये सांगून पुरुषोत्तम मासाची पुण्यप्राप्ती करावी, ही विनंती.

**स्थळ : खरे मंगल कार्यालय, सन्मित्र हौसिंग सोसायटी, राजारामपुरी, विद्यापीठ रोड, कोल्हापूर.**

**फोन : ८९८३१८८८८९, ०२३१ – २५३१०४९ / ५६**

**वेळ : शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी**

**सायं. ५ वा. विष्णूपूजन – आरती – प्रसाद व सायं. ७ वा. सामूहिक भोजन**

या कार्यक्रमासाठी यजमानांना येणारा खर्च रु. ३,०००/– + ३००/– असा एकूण ३,३००/– येणार असून त्यामध्ये ६ व्यक्तींच्या भोजनाचा खर्च समाविष्ट केला आहे. आपणामार्फत अधिक व्यक्ती निमंत्रित करण्यात येणार असतील तर ६ व्यक्तींपुढे प्रत्येकी ४००/– प्रमाणे जादा खर्च येईल.

**भोजन, दक्षिणा, सुवासिनींची ओटी आदी सर्व खर्च वरील रक्कमेत समाविष्ट आहे.**

**नोंदणीची अंतिम तारीख : दि. १ ऑगस्ट २०२३**

**संपर्कासाठी दूरध्वनी : ०२३१–२५४६२२५, ७६२०५४६२२५ (कोल्हापूर चित्पावन संघ)**

**७५८८८३९५२७ (श्री. केदार जोशी, कार्यवाह) ८४५९०१९०९१ (श्री. संतोष साने, संचालक)**

○ Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly ○
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.